


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३१६ ■ मंगळवार, दि.२६ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283/ 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# एसटी महामंडळावर 310 कोटींचा बोजा !

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती, डिझेल दरवाढीने एसटीचा प्रवास महागणार

प्रतिनिधी २६ मे



**मुंबई :** देशात डिझेल दर वाढीचा फटका लालपरीला मोठ्या प्रमाणावर बसत आहे. डिझेल वाढीमुळे एसटीचा प्रवास महागणार असल्याची शक्यता दिसून येत आहे. डिझेल वाढीमुळे आतापर्यंत एसटी महामंडळाच्या खर्चात तब्बल ३१० कोटींची वाढ झाली आहे. याआधी ३३०० कोटी रुपयांचा खर्च महामंडळाचा डिझेलवर होत होता. आता याच खर्चात ३१० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारने मदतीचा हात पुढे केला नाही तर एसटीची भाडेवाढ अटळ आहे. शिवसेना नेते आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज पत्रकार परिषद घेत माहिती दिली. तसेच डिझेल बचतीसाठी काही महत्त्वाच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत.

देशात सातत्याने होत असलेल्या डिझेलच्या दरवाढीमुळे एसटी महामंडळावर आर्थिक संकट ओढवले आहे. एसटी महामंडळ आधीच मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करत आहे. एकट्या एप्रिल २०२६ या एका महिन्यात महामंडळाला जवळपास ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. महागाई अशाच पद्धतीने वाढत राहिली, तर एसटी महामंडळ जगवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे अपरिहार्य ठरेल, असे संकेत प्रताप सरनाईकांनी दिले आहेत. प्रवाशांना दिलासा देताना त्यांनी स्पष्ट केले की, सध्या तरी तातडीने कोणतीही तिकीट किंवा भाडेवाढ लागू केली जाणार नाही. मे महिन्यानंतर सरकारकडून मिळणाऱ्या मदतीचा आढावा घेऊन पुढील निर्णय ठरवला जाईल. एसटी बस प्रवासात महिलांना दिलेली ५० टक्के सूट, दिव्यांगांना आणि समाजातील विविध घटकांना दिली जाणारी मोफत प्रवासाची सुविधा याचे पैसे राज्य शासनाकडून एसटी महामंडळाला नियमित मिळतात, अशी माहिती त्यांनी दिली. त्याचबरोबर एसटी महामंडळात येणाऱ्या काळात इलेक्ट्रिक बसेस वाढवण्यावर भर दिला जात असून, राज्यातील प्रमुख २०० ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठीची निविदा प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर डिझेलचे दर असेच वाढत राहिले तर भाडेवाढ काही प्रमाणात करावी लागेल, असे संकेत देखील मंत्री प्रताप सरनाईकांनी दिले आहेत.

### तर एसटी बसच्या भाड्यात दरवाढ अटळ!

डिझेल दरवाढ होत आहे. त्याचा परिणाम उत्पन्नावर होत आहे. आजही दर स्थिर नाहीत. सध्या तरी शासनाच्या सूचनेप्रमाणे अंमलबजावणी करत आहोत. भविष्यात अशीच परिस्थिती राहिली तर दरवाढ करावी लागेल. आम्ही डिझेल वरील कर कपातीची मागणी राज्य व केंद्राकडे केली आहे. मुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे. आमच्या उत्पन्नावर परिणाम होणार आहे हे मात्र निश्चित आहे. काही प्रमाणात वाढ करून एसटी चालू ठेवावी लागेल, असेही सरनाईकांनी म्हटले आहे.

### डिझेल बचत करणाऱ्या आगारांना बक्षीस

प्रत्येक आगारातून ५ लीटर बचत करण्याचे आवाहन केले आहे. त्यातून रोज १ हजार लीटर डिझेल बचत होईल. तातडीच्या सूचना चालकांना देण्यासाठी आगार प्रमुखांना सूचना दिल्या आहेत. वाहन चालकांचे योग्य समुपदेशन करायला सांगितले आहे. तसेच बसेसची योग्य देखरेख करायला सांगितले आहे. बचत करणाऱ्या चालकांना प्रोत्साहन भत्ता व गौरव करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच जी आगार अधिक बचत करतील, त्यांनाही प्रोत्साहित केले जाईल असेही ते म्हणालेत.

# मोदी म्हणजे महागाई मॅन !

## इंधन दरवाढीवरुन काँग्रेसच्या नेत्यांची पंतप्रधानांवर टीका




वृत्तसंस्था २६ मे

**नवी दिल्ली :** पेट्रोल-डिझेलच्या किमती ११ दिवसांत चौथ्यांदा वाढविण्याचा दणका सोमवारी बसल्यावर काँग्रेसने इन्स्टाग्राम आणि एक्सवरून सरकारवर पुन्हा टीकास्त्र सोडले व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'महागाई मॅन'ची उपमा दिली. प्रमुख विरोधी पक्षाच्या नेतृत्वाने महागाईविरुद्ध समाज माध्यमांवरून आंदोलन सुरू ठेवले आहे.

इन्स्टाग्रामवरील एका पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी पंतप्रधानांना 'महागाई मॅन मोदी' असे संबोधून त्यांच्यावर टीका केली आणि लोकांचा रोष शांत करण्यासाठी इंधनाच्या किमती टप्प्याटप्पाने वाढवल्या जात असल्याचा आरोप केला. 'महागाई मॅन मोदी पुन्हा सक्रिय झाले आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती टप्प्याटप्प्याने वाढवल्या जात आहेत; जेणेकरून ते तुमचे खिसे शांतपणे कापू शकतील. मी गेले अनेक महिन्यांपासून आर्थिक वादळाबद्दल बोलत आहे; परंतु मोदी नेहमीप्रमाणे निवडणुकांमध्ये व्यग्र होते आणि निवडणुका संपताच त्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या किमती आठ रुपयांनी वाढवल्या. ही दरवाढ सुरूच राहणार आहे,' असे राहुल यांनी पोस्टमध्ये लिहिले.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही सरकारवर टीका केली. 'मोदी यांनी महागाई नियंत्रणातील आपले अपयश देशवासीयांसमोर जाहीरपणे मान्य केले पाहिजे. जेव्हा संकट आले, तेव्हा ते निवडणुकीत व्यग्र झाले आणि निवडणुकांनंतर त्यांनी लोकांनाच त्यागाचा उपदेश केला. नंतरच्या ११ दिवसांत तीन वेळा पेट्रोल, डिझेलचे दर चार वेळा वाढवले असे खर्गे म्हणाले. 'मोदी नुकतेच पाच देशांत चक्कर मारून आले,' अशी टीका करून खर्गे म्हणाले, 'मोदी विदेशात जाऊन स्वतःला पुरस्कार देऊन घेतात; परंतु त्या देशाशी झालेल्या करारातून किती गुंतवणूक आली, याबद्दल सरकार गुप्तता पाळते.

# एकाचवेळी ५०० वटवाघुळांचा मृत्यू!

**गडचिरोली :** गेल्या काही दिवसांमध्ये विदर्भातील बहुतांश भागांमध्ये उष्णता कमालीची वाढली आहे. परिणामी उष्माघाताने अनेकांचे जीव गेले आहेत. याचा फटका आता जंगलातील प्राण्यांनाही बसताना दिसत आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा येथे अचानक ५०० वटवाघुळांचा मृत्यू झाला आहे. उष्माघातामुळे या वटवाघुळांचा मृत्यू झाला असावा, असा वन विभागाचा प्राथमिक अंदाज आहे. यापैकी काही वटवाघुळांचे मृतदेह वैद्यकीय चाचणीसाठी पाठवण्यात आले आहेत. सिरोंचा जिल्हा परिषद शाळेच्या मागे वन विभागाच्या कंपाउंडमधील झाडांवर शेकडो वटवाघळाचे वास्तव्य आहे. मात्र वटवाघळांनी पाण्यासाठी अक्षरशः जीव सोडल्याचं चित्र पाहायला मिळालं.

# राज्यातील शाळा तीन दिवस ऑफलाइन, दोन दिवस ऑनलाइन ठेवा !

प्रतिनिधी २६ मे

**मुंबई :** राज्यातील वाढत्या इंधन दरवाढीमुळे स्कुल बस मालकांवर मोठे संकट ओढावले आहे. पुढील महिन्यात राज्यभरात शाळा सुरु होणार आहेत. मात्र, पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढल्याने त्याच दरात स्कुल बसची सेवा पुरवणे आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही. त्यामुळे एकाच सत्रात शाळा सुरु ठेवाव्यात, अशी मागणी स्कुल बस संघटनेकडून करण्यात आली आहे. आठवड्यातून तीन दिवसच शाळा भरवा आणि दोन दिवस ऑनलाइन वर्ग सुरू ठेवा, असे स्कूल बस संघटनेचे म्हणणे आहे.

शाळा सुरू होण्याआधी १ जूनपर्यंत राज्य सरकारने आपली




भूमिका स्पष्ट करावी, अशी विनंती स्कूलबस मालकांकडून करण्यात आली आहे. पेट्रोल आणि डिझेलचे वाढते भाव पाहता राज्यातील स्कूल अँड कंपनी बस ओनर्स असोसिएशनने इंधनदरवाढीनंतर शाळा सुरू होण्यापूर्वीच बस सेवेचे शुल्क वाढवण्याचे संकेत दिले आहेत. सरकारने स्कूलबस क्षेत्राला तातडीने दिलासा देत अनुदान किंवा सवलती द्याव्यात, अशी मागणी संघटनेने केली आहे. यावर आता राज्य सरकार काय निर्णय घेणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.गेल्या दहा दिवसांमध्ये पेट्रोल आणि डिझेल दरात चारवेळा वाढ झाली आहे.

### नागपूरमध्ये स्कुल बसचे भाडे १५ टक्क्यांनी वाढणार

महागाई व वाढलेलले डिझेल पेट्रोलचे दर बघता नागपूर स्कुल बस व स्कुल व्हॅन संघटनेने १० ते १५ टक्के दर वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. अंतरानुसार साधारण हजार रुपये भाडे देणाऱ्या पालकांना १२०० व २००० भाडे देणाऱ्या २४०० रुपये नवीन दर द्यावा लागणार आहे. त्यामुळे पालकांवर शिक्षणाच्या महागाईचा भार वाढला आहे. नवीन नियमानुसार हे भाडे ठरवण्याचा अधिकारी परिवहन विभागाला देण्यात आला त्यामुळे ही दरवाढ परिवहन विभाग मान्य करेल का ? हे बघणं महत्वाचं असणार आहे.

# राज्यात इंधनाची ५२ टक्के अधिक खरेदी- मुख्यमंत्री

**मुंबई :** राज्यात सध्या सुरू असलेल्या इंधन खरेदीच्या गोंधळावर आणि वाढत्या मागणीवर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'पेट्रोल आणि डिझेलची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यात कुठेतरी साठेबाजी होत आहे, असे देखील निदर्शनास येत आहे. त्यासंदर्भात पुरवठा आणि गृह विभाग आता कारवाई करतील. पेट्रोल संदर्भात जो काही सरासरी वापर आहे त्यापेक्षा २३ टक्के जास्त मागणी वाढली आहे. डिझेलच्या संदर्भात ही मागणी ५२ टक्क्यांनी वाढली आहे. त्यामुळे साठेबाजी थांबवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. दरम्यान, राज्यात सध्या इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली.

# कांद्याच्या दरावरून चांदवडमध्ये आंदोलन पेटलं !

## रोहित पवार, दानवेंसह हर्षवर्धन सपकाळ पोलिसांच्या ताब्यात, टायरची जाळपोळ

प्रतिनिधी २६ मे

**नाशिक :** कष्टाने पिकवलेल्या कांद्याला बाजारात मातीमोल भाव मिळत असल्याने राज्यातील शेतकरी कमालीचा संतप्त झाला आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या याच प्रश्नावर आता महाविकास आघाडी आक्रमक झाली असून राज्यात ठिकठिकाणी जोरदार रस्ता रोको आंदोलन करण्यात येत आहे. आंदोलक कार्यकर्ते आणि नेत्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून सरकारविरोधात तीव्र आक्रोश व्यक्त केला आहे. तर कांद्याच्या दरावरून चांदवडमध्ये आंदोलन चिघळले

### सोलापुरात खा. प्रणिती शिंदेंच्या नेतृत्वात आंदोलन

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोर सोलापूर शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्या उपस्थितीत काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रचंड निदर्शने केली. या आंदोलनात खा. प्रणिती शिंदे सहभागी झाल्या. काँग्रेस कार्यकर्त्यांनी सोलापूर-पुणे आणि सोलापूर-हैदराबाद हे दोन्ही राष्ट्रीय महामार्ग रोखून धरले. यावेळी खा. प्रणिती शिंदे म्हणाल्या, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ट्रम्प तात्यांच्या आहारी गेले आहेत. 'ट्रम्प बोले आणि मोदी डोले' अशी सध्याची देशाची अवस्था आहे.

### गंगापुरात कांदे रस्त्यावर फेकले!

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला प्रतिकिलो अवघा सव्वा रुपया दर मिळाल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला. नरहरी रांजणगाव येथील शेतकरी लक्ष्मण दुशिंग यांच्या कांद्याला प्रतिक्विंटल अवघे १२५ रुपये, तर इतर शेतकऱ्यांना १३० रुपये दर मिळाला. वाहतुकीचा खर्चही निघत नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी गंगापूर-वैजापूर महामार्गाच्या गेटसमोर सर्व कांदे रस्त्यावर फेकून देत 'रास्ता रोको' केला, ज्यामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.




# केरळमध्ये आज मान्सून दाखल होणार !

## 8 राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज

वृत्तसंस्था २६ मे

**नवी दिल्ली :** मान्सून आज केरळात दाखल होणार आहे. भारतीय हवामान विभागाने मंगळवार, २६ मे रोजी केरळमध्ये मान्सूनचे आगमन होऊ शकते, असा अंदाज वर्तवला होता. या दक्षिण भारतीय राज्यात मुसळधार पाऊस सुरू असला तरी, विभागाने मान्सूनबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. त्याच्या आगमनासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचे म्हटले जात आहे. देशातील अनेक राज्यात उष्णता मोठी वाढली आहे.

भारतीय हवामान विभागाने मंगळवारी दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन ते तीन दिवसांत नैऋत्य आणि आग्नेय अरबी समुद्र, कोमोरिन प्रदेश, बंगालचा उपसागर आणि उर्वरित अंदमान आणि निकोबार बेटांमध्ये



मान्सून पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. यामुळे मान्सूनला केरळमध्ये पोहोचायला वेळ लागू शकतो. केरळमध्ये मान्सूनच्या आगमनाची सामान्य तारीख १ जून आहे. तीव्र उष्णतेचा सर्वाधिक फटका वायव्य भागाला बसण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने आता २८ आणि २९ मे रोजी जम्मू आणि काश्मीर तसेच हिमाचल प्रदेशात पावसाचा अंदाज वर्तवला आहे. २७ मे रोजी पंजाब, हरयाणा, चंदीगड, दिल्ली आणि पूर्व उत्तर प्रदेशात हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

### महाराष्ट्राला ५ जूनपर्यंत करावी लागेल प्रतीक्षा

१ जून रोजी मान्सून केरळच्या किनारपट्टीवर दाखल होत असतो. आणि तिथून पुढे अनुकूल स्थिती असल्यास मान्सून वेगाने महाराष्ट्राच्या दक्षिण किनारपट्टीवर दाखल होतो. यंदा मान्सून ५ जूनच्या आसपास दक्षिण कोकणात दाखल होण्याचा अंदाज आहे.

### केरळच्या अनेक जिल्ह्यांमध्ये सतर्कतेचा इशारा

हवामान विभागाने केरळच्या बहुतांश भागांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तिरुवनंतपुरम, कोल्लम, अलाप्पुझा आणि एर्नाकुलम या चार जिल्ह्यांसाठी यलो अलर्टही जारी करण्यात आला आहे. बुधवारी एर्नाकुलम वगळता इतर तीन जिल्ह्यांसाठीही यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.




CMYK CMYK

## युवक युवतींना महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीमध्ये प्रशिक्षणाची संधी

**अकोला :** भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयामार्फत प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना राबविण्यात येत आहे. या महत्वाकांक्षी योजनेचा मुख्य उद्देश देशातील तरुणांना भारतातील पहिल्या ५०० नामांकित कंपन्यामध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव देऊन त्यांचे कौशल्य विकसित करणे हा आहे. अशा रोजगाराच्या संधी अकोला जिल्हयातील उमेदवारांना उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, अकोला या कार्यालयाच्यावतीने पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे (प्लेसमेंट ड्राईव्ह) आयोजन दि. २९ मे २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, २ रा माळा, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला येथे केले आहे. मेळाव्यामध्ये महिंद्रा ॲण्ड महिंद्रा या नामांकित कंपनीने प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना अंतर्गत प्रशिक्षण संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.



# 'नदी वाचली तर संस्कृती वाचेल'

भारतभूमी ही संतांची, संस्कृतीची आणि नद्यांची भूमी आहे. आपल्या देशामध्ये असंख्य नद्या वाहतात. गंगा नदी, सिंधू नदी, नर्मदा नदी, तापी नदी, इंद्रायणी नदी, चंद्रभागा नदी अशा अनेक नद्या आपल्या संस्कृतीच्या, श्रद्धेच्या आणि जीवनाच्या केंद्रस्थानी आहेत. आपण या नद्यांना 'माता' म्हणतो, त्यांची पूजा करतो, त्यांना पवित्र मानतो. कारण नदी म्हणजे फक्त पाण्याचा प्रवाह नाही; नदी म्हणजे जीवन, संस्कृती, शेती, अन्न, आरोग्य आणि अध्यात्म यांचा आधार आहे.

परंतु आज एक अत्यंत वेदनादायक आणि गंभीर प्रश्न आपल्या समोर उभा आहे — ज्या नद्यांना आपण माता मानतो, त्याच नद्यांचे प्रदूषण आपण स्वतः करत आहोत. श्रद्धा आणि वास्तव यामधील हा विरोधाभास समाजाने समजून घेण्याची वेळ आता आली आहे.

तीर्थक्षेत्रांवर लाखो लोक जातात. नदीमध्ये स्नान करतात, पूजा करतात, दर्शन घेतात. श्रद्धा असणे चुकीचे नाही; उलट श्रद्धा ही भारतीय संस्कृतीची ओळख आहे. पण श्रद्धेच्या नावाखाली आपण नदीमध्ये प्लास्टिकच्या पिशव्या, कपडे, साबण, कचरा, पूजेचे साहित्य, अन्नाचे उरलेले पदार्थ टाकतो. अनेकजण नदीमध्ये कपडे धुतात, साबण लावून अंघोळ करतात, थुंकतात, गुळण्या करतात. काहीजण तर घरातील घाण, धार्मिक अवशेष आणि मृत व्यक्तींची राखही नदीत विसर्जित करतात. हे करताना आपण एकक्षणही विचार करत नाही की हेच पाणी पुढे जाऊन माणसे, प्राणी आणि पक्षी वापरणार आहेत.

नदीचे पाणी दूषित झाल्यामुळे अनेक रोग निर्माण होतात. पोटाचे आजार, त्वचेचे विकार, संसर्गजन्य रोग, दूषित पाण्यामुळे होणारे त्रास समाजात वाढत आहेत. पूर्वीच्या काळात नद्या विशाल होत्या, पाऊस भरपूर पडत होता, लोकसंख्या कमी होती. त्यामुळे नैसर्गिकरित्या पाण्याचे शुद्धीकरण होत असे. पण आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. लोकसंख्या वाढली, शहरांचा विस्तार झाला, कारखाने वाढले, सांडपाणी वाढले आणि नद्यांचे अस्तित्व धोक्यात आले.

आज प्रश्न फक्त पर्यावरणाचा नाही; प्रश्न आपल्या संस्कृतीच्या अस्तित्वाचा आहे. आपण देवाला स्पर्श करण्याआधी हात धुतो, मंदिरामध्ये चपला घालून जात नाही, देवासमोर स्वच्छ राहण्याचा प्रयत्न करतो. मग ज्या नदीला आपण 'माता' म्हणतो, तिच्यामध्ये घाण टाकताना आपल्याला अपराध का वाटत नाही? नदीमध्ये फेकलेले कपडे, प्लास्टिक, अंडरवेअर, पूजा साहित्य हे त्या नदीमातेचा अपमान नाही काय? खरा धर्म हा फक्त पूजा करण्यामध्ये नसतो; खरा धर्म हा जपणुकीमध्ये असतो. देव फुलांमध्ये नसतो, तर स्वच्छतेमध्ये, संवेदनशीलतेमध्ये आणि मानवतेमध्ये असतो. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे संत गाडगे महाराज. गाडगे महाराज जेव्हा पंढरपूर येथे जात असत, तेव्हा ते प्रथम मंदिरात दर्शनाला जात नसत. ते आधी चंद्रभागा नदीचा परिसर स्वच्छ करत असत. कारण त्यांना माहिती होते की खरा ईश्वर स्वच्छतेमध्ये आहे. विशेष म्हणजे गाडगे महाराज फार उच्चशिक्षित नव्हते. पण त्यांच्याकडे अंतर्मनाची जागृती होती. त्यांनी समाजाला शिकवले की 'स्वच्छता हाच खरा धर्म आहे.' आज आपण मोठमोठ्या पदव्या घेतो, शिक्षण घेतो, तंत्रज्ञान वापरतो; पण साधी सामाजिक जबाबदारी विसरत चाललो आहोत. हेच खरे दुर्दैव आहे.

आपण मंदिरात जाऊन देवाकडे सुख, शांती, पैसा, आरोग्य मागतो. पण त्याच मंदिराजवळील नदी घाण करून बाहेर पडतो. मग आपल्या भक्तीचा अर्थ काय उरतो? देवाला फक्त नारळ, फुले आणि अगरबत्ती नको असते; देवाला स्वच्छ मन आणि स्वच्छ समाज हवा असतो. आज प्रत्येक व्यक्तीने स्वतःपासून बदल सुरू करण्याची गरज आहे. नदीमध्ये स्नान करायचे असेल तर स्वच्छतेची काळजी घ्या. साबण वापरू नका. कपडे धुणे टाळा. प्लास्टिक आणि कचरा नदीमध्ये टाकू नका. इतरांनी घाण केली तर त्यांना शांतपणे समजवा. शक्य असेल तिथे स्वतः पुढाकार घेऊन स्वच्छता मोहीम राबवा.

एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मृत व्यक्तींच्या राखेचे विसर्जन. पूर्वीच्या काळात ते योग्य असू शकत होते, कारण नद्या विशाल आणि स्वच्छ होत्या. पण आज परिस्थिती वेगळी आहे. प्रत्येकाने विचार केला पाहिजे की आपण ज्या नदीमध्ये राख विसर्जित करतो, तेच पाणी पुढे इतर लोक वापरणार आहेत. त्याऐवजी त्या राखेमध्ये एक झाड लावले तर? त्या झाडामध्ये आपल्या आई-वडिलांचे अस्तित्व जिवंत राहील. ते झाड सावली देईल, प्राणवायू देईल, समाजाला उपयोगी पडेल. हा खरा श्रद्धेचा आणि स्मरणाचा मार्ग ठरू शकतो.

आज समाजाला नवीन धार्मिकतेची गरज आहे — अशी धार्मिकता जी स्वच्छतेला, पर्यावरणाला आणि मानवतेला महत्त्व देईल. नुसते देवपूजन करून चालणार नाही; देवत्व समजून घ्यावे लागेल. नदी वाचवणे म्हणजे भविष्यातील पिढी वाचवणे आहे. पाणी वाचवणे म्हणजे जीवन वाचवणे आहे.

आपल्या देशातील प्रत्येक नदी ही संस्कृतीची वाहिनी आहे. जर नद्या संपल्या तर आपली संस्कृती, शेती, आरोग्य आणि श्रद्धा सर्व काही धोक्यात येईल. म्हणूनच आता प्रत्येकाने एक संकल्प केला पाहिजे —

नदीमध्ये कचरा टाकणार नाही.

प्लास्टिकचा वापर कमी करू.

तीर्थक्षेत्र स्वच्छ ठेवू.

इतरांनाही जागरूक करू.

नदीला माता मानत असू तर तिचा सन्मान करू.

'स्वच्छ नदी, सुंदर भारत' हा विचार आचरणात आणू.

समाज बदलण्यासाठी मोठ्या भाषणांची गरज नसते; छोट्या कृतींची गरज असते. आपण प्रत्येकाने जर एक पाऊल पुढे टाकले, तर संपूर्ण देश बदलू शकतो.

चला, आपण सर्वजण मिळून एक नवा संकल्प करूया —

'नदी माझी माता आहे; तिचे रक्षण करणे ही माझी जबाबदारी आहे.'

कारण शेवटी —

जिथे स्वच्छता आहे, तिथेच देवत्व आहे.

जिथे नदी पवित्र आहे, तिथेच संस्कृती जिवंत आहे.

**निवृत्ती तायडे**
हिवरखेड ता. तेल्हारा.
जि. अकोला
मो.७७०९५१७०१९

# आई-वडिलांची प्रतिष्ठा जपा विवाहाचा निर्णय जबाबदारीने घ्यावा

आई-वडील हे आपल्या आयुष्याचे पहिले गुरु, आदर्श, पहिले मित्र आणि शेवटपर्यंतचे आधार असतात. त्यांनी आपल्याला जन्म देऊन हे सुंदर जग पहावयास दिले आहे, बोट धरून चालायला शिकवले, स्वतः अर्धपोटी उपाशी राहून आपल्या तोंडात घास भरवला आहे. मुलगा असो वा मुलगी, प्रत्येकाच्या जडणघडणीत आई-वडिलांचे कष्ट, त्याग आणि स्वप्ने गुंतलेली असतात. आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात शिकणारी, कमावती पिढी स्वतःचे निर्णय घेऊ शकते, हा बदल असने स्वागतार्ह आहे. पण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. निर्णय घेताना आपण ज्या झाडाच्या सावलीत वाढलो, त्या झाडाच्या मुळांवर घाव घालणे कितपत योग्य आहे.

**आंतरजातीय विवाह – पण वास्तव विसरू नका**

आज आंतरजातीय, आंतरधर्मीय प्रेमविवाहाचे प्रमाण वाढले आहे. संविधानानुसार दोन जीव एकत्र येणे वाईट नाही. पण लग्न म्हणजे फक्त दोन व्यक्तींचे नसते, तर दोन कुटुंबाचे, संस्कृतींचे, दोन जिवाचे मिलन असते. भाषा, जेवण, सण, देवधर्म, रीतिरिवाज, सगळ्याच बाबी दोघांनाही स्विकाराव्या लागतात. सुरुवातीला हे सगळे 'सांभाळून' घेऊ असे वाटते, पण कालांतराने त्याच गोष्टी भांडणाचे कारण बनतात. अनेक घटनांमध्ये मुलींवर अन्याय अत्याचार झालेल्या घटना आपण नेहमीच बघत असतो. अशा प्रकरणात मुलींना जीवही गमवावा लागलेल्या बातम्या आपण वाचल्या आहेत. अशा वेळी माहेरचे दार बंद असते आणि सासरचे लोकही आपलेसे करत नाहीत. त्यामुळे दोन्ही कुटुंबाने संगणमत करूनच निर्णय घेणे योग्य ठरते.

**ठरवून केलेला विवाह – अनुभवाचा आधार**

आई-वडील शत्रू नसतात. ते मुलांचे वाईट कधीच चिंतणार नाहीत. स्थळ पाहताना ते मुलगा, त्याची नोकरी, व्यसन, स्वभाव, त्याचे आई-वडील, घरची परिस्थिती, शेती, कर्ज – सगळी खडानखडा चौकशी करतात. कारण त्यांना आपली लेक सुखात राहिलेली पाहायची असते. अरेंज मॅरेजमध्ये प्रेम लग्नानंतर हळूहळू फुलते. ते आकर्षणावर नाही, तर विश्वासावर आणि जबाबदारीवर आधारलेले असते. म्हणूनच ते अधिक योग्य ठरते.

**शेवटचा विचार**



प्रेम करा, पण आंधळे होऊ नका. आवडत्या व्यक्तीबद्दल आई-वडिलांशी मोकळेपणाने बोला. त्यांना पटवून द्या. वेळ लागेल, पण त्यांचा विश्वास संपादन करा. पळून जाणे, खोटे बोलणे, फसवणूक करणे हा मार्ग नाही. कारण लग्न मोडू शकते, प्रेमाचे आकर्षण संपुष्टात येऊ शकते, पण आई-वडिलांच्या डोळ्यात आलेले पाणी आणि त्यांच्या तोंडून निघालेला शाप कधीच पुसला जात नाही. दोन्ही कुटुंबाच्या संमतीनेच आयुष्याचा निर्णय घ्यावा.

लक्षात ठेवा, आपण मोठे झालो म्हणजे आई-वडील लहान होत नाहीत. त्यांचा अनुभव, त्यांचे आशीर्वाद हीच आपली खरी संपत्ती आहे. विवाहाचा निर्णय घेताना एकदा डोळे मिटून आठवा – तापात रात्रभर डोक्यावर हात फिरवणारी आई आणि खांद्यावर बसवून शाळेत सोडणारा बाप. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू हिरावून घेण्याचा अधिकार आपल्याला नाही. स्वसमाजात, आई-वडिलांच्या संमतीने, विचारपूर्वक केलेला विवाहच खरा सुखाचा, सुरक्षिततेचा आणि सन्मानाचा, आणि नवं आयुष्य जगण्याचा मार्ग आहे.

**प्रेम आणि लग्न - दोन वेगळ्या गोष्टी**

सिनेमा किंवा टिव्ही मालिकात दाखवलेले प्रेम आणि प्रत्यक्ष संसार यात जमीन-अस्मानचा फरक आहे. प्रेमात असताना समोरच्याचे फक्त चांगले गुण दिसतात. पण लग्न म्हणजे जबाबदारी, घर सांभाळणे, आर्थिक ओढाताण, सासू-सासऱ्यांचा स्वभाव, मुलांचे संगोपन या सगळ्याला तोंड द्यावे लागते. प्रेमविवाह दोन्ही कुटुंबांनी मान्यता देऊन झाला तर योग्य ठरतो परंतु अनेकदा मुलगा-मुलगी एकमेकांना नीट ओळखत नाहीत. आकर्षण ओसरले की भांडणे सुरू होतात. माहेरचा आधार नसल्याने अनेक मुलींना अन्याय सहन करावा लागतो. याउलट, आई-वडिलांनी चौकशी करून ठरवलेले लग्न म्हणजे दोन कुटुंबांचा विचार करून घेतलेला निर्णय असतो. तिथे चुकांची शक्यता कमी होते. भांडण झाले तरी दोन्ही बाजूचे वरिष्ठ लोक मध्यस्थी करून संसार सावरतात.

**आई-वडिलांचे ऋण कधीही फिटत नाही**


मुलगा किंवा मुलगी दोघांनाही लहानाचे मोठी करणे म्हणजे एक तपश्चर्या असते. वडिलांनी उन्हातान्हात राबून त्यांना शिक्षण दीले. आईने स्वतःची हौस-मौज, शिक्षण, इच्छा बाजूला ठेवून मुलीच्या भविष्याला प्राधान्य दिलेले असते. मुलीच्या लग्नासाठी तिने माहेरहून आणलेली एखादी वस्तू, घरचे शेत विकून पैसे जमा करून मुलांचे भविष्य घडवीलेले असते. परंतु जेंव्हा मुलगा किंवा मुलगी केवळ चार महिन्यांच्या ओळखीवर, मोबाईलवरच्या दोन गोड शब्दांवर परक्यांवर विश्वास ठेवून घर सोडतात, तेव्हा त्या आई-बापाच्या काळजाचे पाणी होते. गावात, नात्यात, समाजात 'मुलगा किंवा मुलगी पळून गेले' हा शब्द त्यांना आयुष्यभर टोचत राहतो. त्यांची मिळवलेली प्रतीष्ठा धुळीला मिळते.

शब्दांकन: प्रा. प्रज्ञानंद थोरात, अकोला मो. ९८२२६७४४८७

**संजय कडोळे**
कारंजा लाड, वाशिम

## दिन विशेष

### मराठी साहित्यातील 'शेक्सस्पियर' राम गणेश गडकरी!



आज जयंती

राम गणेश गडकरी हे गोविंदाग्रज, बाळकराम या टोपणनावांनीही ओळखले जातात. ते मराठी कवी, नाटककार आणि विनोदी लेखक होते. गोविंदाग्रज ह्या टोपणनावाने त्यांनी सुमारे १५० कविता लिहिल्या, आणि बाळकराम ह्या टोपणनावाने काही विनोदी लेख लिहिले. ह्या साहित्याच्या जोडीला 'एकच प्याला', 'प्रेमसंन्यास', 'पुण्यप्रभाव', आणि 'भावबंधन' ही चार पूर्ण नाटके (आणि 'राजसंन्यास' आणि 'वेड्यांचा बाजार' ही दोन अपुरी राहिलेली नाटके) लिहिली. राम गणेश गडकरी यांना महाराष्ट्राचा 'शेक्सपियर' समजले जाते.

विविध नाट्यप्रेमी संस्थांनी, राम गणेश गडकरी यांच्या आणि त्यांची पत्नी रमाबाई यांच्या नावाने नाटककारांसाठी आणि नाट्याभिनयासाठी अनेक गडकरी पुरस्कार ठेवले आहेत. नागपूरला राम गणेश गडकरी' या नावाचा एक साखर कारखाना आहे. गडकरींचा जन्म २६ मे १८८५ रोजी नवसारी येथील गणदेवी या गावात झाला. वयाच्या ८ व्या वर्षीच त्यांचे वडील गणेश वासुदेव गडकरी निवर्तले. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचा धाकटा भाऊ गोविंदही अकालीच मरण पावला. रां ग गडकरी देखील अल्प आयुष्य लाभलेले ३४ वर्ष आयुष्य मिळाले. या कौटुंबिक धक्क्यांतून सावरताना गडकरींचे कुटुंब पुण्यात स्थायिक झाले. गडकऱ्यांचे शालेय शिक्षण पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये व त्यानंतरचे शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालयात झाले.

महाविद्यालयात शिकत असताना मित्राच्या ओळखीने गडकरी 'किर्लोस्कर नाटक मंडळी'त दाखल झाले. या किर्लोस्कर नाटक मंडळीने चालवलेल्या 'रंगभूमी नावाच्या मासिकातून, तसेच शिवराम महादेव परांजपे यांच्या काळ वृत्तपत्रातून व हरिभाऊ आपट्यांच्या 'करमणूक' नियतकालिकातून ते कविता, लेख लिहू लागले. कविता व लेखांसोबतच ते नाट्यलेखनही करू लागले. गडकऱ्यांच्या अनेक नाटकांची नावे ही पाच अक्षरीच आहेत. त्यांची नाटके हा आजही अनेकांच्या अभ्यासाचा विषय आहे. भावबंधन, एकच प्याला यांसारख्या नाटकांची तर आजही एव्हरग्रीन म्हणून जाहिरात केली जाते. वेड्याचा बाजार आणि राजसंन्यास ही त्यांची नाटके अपूर्ण राहिली. गडकरी दीर्घायुषी झाले असते ती नाटके तर पूर्ण झालीच असती पण नव्या नाटकांचीही त्यात भर पडली असती.

**राम गणेश गडकरींचा परिचय**
**जन्म नाव** - राम गणेश गडकरी
**टोपणनाव** - गोविंदाग्रज , बाळकराम, सवाई नाटकी
**जन्म** - २६ मे १८८५ गणदेवी, जि. नवसारी , गुजरात
**मृत्यू** - २३ जानेवारी १९१९ सावनेर ,जि. नागपूर
**कार्यक्षेत्र** - नाटककार, कवी, लेखक
**साहित्य प्रकार** - कविता, नाटके, विनोदी कथा
**प्रसिद्ध साहित्यकृती** - एकच प्याला, प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, भावबंधन
**वडील** - गणेश वासुदेव गडकरी
**आई** - सरस्वतीबाई गणेश गडकरी
**पत्नी** - प्रथम - सीताबाई गडकरी, द्वितीय - रमाबाई गडकरी

## नवतपात थोडंही दुर्लक्ष ठरू शकतं जीवघेणं!

पुढील ९ दिवसांमध्ये खासकरून लहान मुले, वृद्ध आणि आधीच आजारी असलेल्यांना धोका जास्त असेल. अशात या दिवसांमध्ये काय करावं आणि काय करू नये हे माहीत असणं फार आवश्यक आहे. नवतपात थोडंही दुर्लक्ष जीवघेणं ठरू शकतं. त्यामुळे विशेष काळजी घेण्याची गरज आहेरु

देशाच्या अनेक भागांमध्ये उन्हाचा पारा फारच वाढला आहे. त्यात विदर्भातील काही शहरांमध्ये तर तापमान ४६ ते ४७ डिग्रीपर्यंत पोहोचलंय. दरम्यान सोमवारपासून म्हणजे २५ मे पासून नवतपाला सुरूवात झाली आहे. जे २ जूनपर्यंत राहणार आहे. असं मानलं जातं की, या नऊ दिवसांमध्ये सूर्य अधिक तापतो, ज्यामुळे भयंकर गरमी आणि उष्माघाताचा धोका वाढतो. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने सांगितलं की, यादरम्यान थोडा जरी बेजबाबदारपणा केला तर तर आरोग्यासंबंधी गंभीर समस्या होऊ शकतात. खासकरून लहान मुले, वृद्ध आणि आधीच आजारी असलेल्यांना धोका जास्त असेल. अशात या दिवसांमध्ये काय करावं आणि काय करू नये हे माहीत असणं फार आवश्यक आहे.

शरीर हायड्रेट ठेवा - या दिवसांमध्ये पाणी कमी पिण्याची चूक अजिबात करू नका. दिवसभर साधारण ३ ते ४ लीटर पाणी प्या. गरज असेल तर ओआरएस, लिंबू सरबत किंवा मीठ-साखरेचं पाणी पिऊ शकता.

**काय करू नये?**

तापमान जास्त असल्यावर जास्त मेहनतीचं काम केल्याने शरीर लवकर थकतं आणि हीट स्ट्रोकचा धोका वाढतो. लहान मुलांना आणि पाळीव प्राण्यांना गाडीत एकटं सोडू नका. बंद वाहनात तापमान वेगाने वाढतं, याने स्थिती गंभीर होऊ शकते. डिहायड्रेशन वाढवणारे पेय कमी प्या. दारू, चहा-कॉफी, कोल्ड ड्रिंक्स, सोडा पिणं टाळा. विनाकारण बाहेर फिरणं टाळा.

..........

**कशाकडे दुर्लक्ष करू नये?**

चक्कर येत असेल, उलटी, जास्त घाम, कमजोरी किंवा थकवा जाणवत असेल तर अजिबात दुर्लक्ष करू नका. ही लक्षणं हीट स्ट्रोक किंवा डिहायड्रेशनचे संकेत असू शकतात.

हलके आणि सूती कपडे - गरमीमध्ये हलके, कमी डार्क आणि सूती कपडे घालावेत. कारण याने शरीर थंड ठेवण्यास मदत मिळते.

बाहेर पडताना काळजी घ्या - जर घराबाहेर जाणं आवश्यक असेल तर डोकं, चेहरा आणि मान चांगली झाका. टोपी, छत्री, स्कार्फचा वापर करा. डोळ्यांसाठी गॉगल वापरा. दुपारी बाहेर जाणं टाळा - दुपारी १२ वाजेपासून ते ४ वाजेपर्यंत तापमान जास्त असतं. अशात या वेळेत बाहेर जाणं टाळावं.

## श्री राम कथेनिमित्त भव्य बाईक रॅली



### महाराजांचे उत्साहात स्वागत

प्रतिनिधी २६ मे

**मूर्तिजापूर :** शहरात आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथेनिमित्त गुरुवारी सकाळी भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला नागरिक व रामभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. श्रीराम कथा सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणात रंगून गेले होते.

कैलास अग्रवाल यांच्या जुनी मिल परिसरातून बाईक रॅलीला प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर ही रॅली स्टेशन परिसर, जुनी वस्ती मार्गे ओम जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरी, भटोरी रोड येथे उत्साहात संपन्न झाली. रॅलीदरम्यान जय श्रीरामच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

अनेक युवक भगवे झेंडे हातात घेऊन मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. श्रीराम कथा प्रवचनासाठी आगमन झालेल्या महाराजांचे शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. ठिकठिकाणी पुष्पवृष्टी, हार-फुलांनी स्वागत तसेच भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. धार्मिक वातावरणामुळे शहरात भक्तिमय आणि उत्साही माहोल निर्माण झाला होता. या श्रीराम कथा सोहळ्याचे आयोजन देवकरण रामप्रताप अग्रवाल परिवाराच्या वतीने करण्यात आले असून, कथा स्थळ ओम जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरी येथे दररोज मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहवे असे आयोजकांनी नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीराम कथेमधील आध्यात्मिक ज्ञानाचा लाभ घेण्याचे आवाहन अँड अविन अग्रवाल यांनी केले आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. २६ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्हा परिषदेच्या शाळांऐवजी पालकांचा कल इंग्रजी माध्यमाकडे

अनवर खान २६ मे

**मूर्तिजापूर :** ग्रामीण भागातील शिक्षणाचा पाया मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद शाळांना आता खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. कधीकाळी विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजणाऱ्या झेडपी शाळांऐवजी आता पालकांचा आणि मुलांचा ओढा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वाढताना दिसत आहे. गेल्या तीन वर्षात हजारो विद्यार्थ्यांनी या शाळांना रामराम करून खासगी शाळांची वाट धरली आहे. याकडे शिक्षण विभागाने गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे शिक्षण विभागातील जाणकार सांगतात.

अकोला जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शेकडो शाळा आहेत, तर हजारांहून अधिक शिक्षक आहेत. शाळांना इमारती, पटांगण सुविधाही आहे. ग्रामीण भागातही शाळा असल्याने विद्यार्थ्यांना गावच्या ठिकाणीच शिक्षणाची सुविधा मिळत आहे. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, पुस्तके, गणवेश, तसेच मध्यान्ह भोजनही मिळत आहे. त्यामुळे या सुविधा मिळूनही शाळेतील पटसंख्या कमी होऊ लागली आहे. पालकांचा कल इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वाढत चालला असल्याने जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी संख्या कमी होत आहे.

### जि. प. शाळांमधील पटसंख्या घटण्याची मुख्य कारणे

सेमी इंग्रजीचे पर्याय जिल्हा परिषद शाळांमध्ये उपलब्ध केले असले, तरी पूर्ण इंग्रजी माध्यमाच्या तुलनेत पालक त्याला कमी पसंती देत आहेत. काही दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये डिजिटल क्लासरूम, खेळाची मैदाने आणि सुसज्ज स्वच्छतागृहांची आजही वानवा आहे. खासगी इंग्रजी शाळा विद्यार्थ्यांसाठी स्कूल बस किंवा व्हॅनची सोय करतात, ज्यामुळे पालकांना मुलांना शाळेत सोडण्याची चिंता नसते. इंग्रजी शाळेत आपल्या पाल्याने शिक्षण घेणे हे सध्याच्या समाजात 'स्टेटस सिम्बॉल' बनत चालले आहे. जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक हे विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न करतात. काही शिक्षक हे शिक्षणात आमूलाग्र बदल करून विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. आपल्या शाळेतील पटसंख्या वाढविण्यात यश येत आहे. मात्र, अनेक शिक्षक इतर कामांतच अधिक गुंतलेले असतात. त्यामुळे अध्ययनाकडे दुर्लक्ष होत असल्याने हेही एक पटसंख्या कमी होण्याचे कारण नाकारता येत नाही.

### शाळांचे अस्तित्व धोक्यात

दरवर्षी कमी पटसंख्या असलेल्या काही जिल्हा परिषदेच्या शाळा बंद होण्याच्या किंवा शेजारच्या शाळांमध्ये समाविष्ट करण्याच्या मार्गावर असल्याने या शाळांचे अस्तित्व धोक्यात येऊ पाहत आहे.

### शासनाने उपाय योजने करणे गरजेचे



जि.प. शाळा बंद होण्याचा थेट फटका गरीब आणि वंचित घटकातील मुलांना बसत आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांना खासगी शाळांची फी परवडत नाही अशा विद्यार्थ्यांचे नुकसान होत शासनाने त्वरित या संदर्भात शाळा सुधार समिती अंतर्गत उपायोजना करून गोरगरिबांना वंचितांना उच्च व चांगला शिक्षण कसा देता येईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे

**अब्दुल खालिक**
समाजसेवक



# मूर्तिजापूरात खरीप मशागतीसाठी डिझेलचा तुटवडा

## शिवसेना (उबाठा) आणि शेतकरी संघटना आक्रमक

**मूर्तिजापूर :** खरीप हंगामाच्या तोंडावर शेतीच्या कामांसाठी डिझेलचा तुटवडा जाणवू लागल्याने तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. येथील 'आनंद पेट्रोल पंपावर' शेतकऱ्यांना डिझेल देण्यास नकार दिला जात असल्याची माहिती मिळताच, शिवसेना (उबाठा) पक्ष आणि शेतकरी संघटनेच्या वतीने आक्रमक पवित्रा घेत 'जवाब दो आंदोलन' करण्यात आले. यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी आणि शेतकऱ्यांनी पेट्रोल पंप प्रशासनाला धारेवर धरले.

हे आंदोलन शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख गजानन पाटील चौधरी, शेतकरी सेना प्रमुख अरविंद तायडे, शेतकरी संघटनेचे सुरेश जोगळे, चंद्रकांत तिवारी, अमोल तांबडे आणि बाळासाहेब खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. आंदोलकांनी थेट पंप संचालकांना गाठून, तालुक्यात डिझेलचा खरोखरच तुटवडा आहे का? आणि जर असेल, तर याबाबत उपविभागीय अधिकारी किंवा तहसीलदार मॅडम यांना आधीच निवेदन का दिले नाही?' असा जाब विचारला. आंदोलन सुरू असतानाच २५ किलोमीटर अंतरावरून डिझेलसाठी आलेले शेतकरी प्रफुल बढे आणि संजय डिके हे ट्रॅक्टर घेऊन पंपावर थांबले होते. डिझेलअभावी ते रिकाम्या हाताने परत जाण्याच्या तयारीत होते. मात्र, शिवसेना आणि शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेत, पंप संचालकांना रिझर्व्ह (राखीव) कोट्यातून या शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरमध्ये डिझेल टाकण्यास भाग पाडले. हक्काचे डिझेल मिळाल्याने शेतकऱ्यांनी दोन्ही संघटनांचे आभार मानले. प्रशासनाने तातडीने पावले न उचलल्यास शिवसेना आणि शेतकरी संघटनेच्या वतीने संपूर्ण तालुक्यात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेवटी देण्यात आला.

## सैनिकी मुलां-मुलींचे वसतीगृह (पी.आर.टी.सी.) येथे एकत्रित मानधनावरील तात्पुरत्या पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अकोला :** सैनिकी मुलां/मुलींचे वसतीगृह, पी.आर.टी.सी अकोला येथे माजी सैनिक, युध्दविधवा, माजी सैनिक विधवा आणि नागरी उमेदवार यांना अशासकीय, तात्पुरत्या स्वरुपाचे व एकत्रित मानधनावर नोकरीची संधी सैनिकी मुलां/मुलींचे वसतीगृह, पि.आर.टी. सी अकोला येथे माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, नागरी प्रवर्गातून वसतीगृह अधिक्षीका, सहायक वसतीगृह अधिक्षक/अधिक्षीका, चौकीदार, स्वयंपाकी, माळी व सफाई कामगार या पदांकरीता जागा भरावयाच्या आहेत. सदरची पदे हि अशासकीय, तात्पुरत्या स्वरुपाची व एकत्रित मानधनावर आहेत.

वसतीगृह अधिक्षीका आणि चौकीदार (वसतिगृह) हि निवासी पदे आहेत. तसेच वसतिगृह अधिक्षीका, सहा. वसतिगृह अधिक्षक/अधिक्षीका व चौकीदार यांची पदे माजी सैनिक, माजी सैनिक विधवा यांचेसाठी राखीव आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज सैन्य सेवा पुस्तक, आधार कार्ड व ०२ फोटो कागदपत्रासह दिनांक ०१ जून २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अकोला येथे सादर करावेत आणि या संधीचा लाभ घ्यावा असे श्री चंद्रशेखर बाळासाहेब भोसले, सहा. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

अधिक माहितीसाठी कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक १७२४- २४३३३७७ वर संपर्क साधवा

# सावरा ते पणज रोडवरील महाकाय खड्डा बनला मृत्यूचा सापळा

पवन बेलसरे २६ मे

**अकोट :** अकोट तालुक्यामधील ग्रामीण भाग शेतकऱ्यांना पाण्याची सुविधा जमिनीचा पोत लागवड सिंचन भाग वाढविणे शेतकऱ्यांना उत्पन्नात ओलिताच्या माध्यमातून प्रगती पदासाठी शेतकऱ्याच्या हिताचे पाऊल प्रशासनाने शहापूर प्रभूचा प्रकल्प हा नदीवर निर्माण केला पणज या मुख्य रोडवर गेल्या काही महिन्यापासून लघु पाटबंधारे विभागाने व शहापूर ब्रहुत प्रकल्पाच्या अंतर्गत महाकाय खड्डा खोदून अपघाताला आमंत्रण देण्याचे अपघात ग्रस्त कार्य केले असून रोडच्या कडेला मुख्य भिंतीच्या कालव्यामधून प्रकल्पाचे किरकोळ काम करण्याकरिता मुख्य रोडवर बला मोठा खड्डा खोदून ठेवला आहे.



बाजूला खूप मोठी झाडांची वाढलेली आहे रोडच्या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी असून रोडवरून खड्ड्यामध्ये कोणतेही वाहन दिवस किंवा रात्रीला पडली आहे व वाढते प्रमाण आहे त्यामुळे वाहनांचे अपघाताचे प्रमाण वाढते असून बकऱ्या गुरेढोरे शेतकऱ्यांची जनावरे या खड्ड्यात पाणी पिण्याकरिता गेली असता थेट मरणाचे आमंत्रण देत आहेत, या भोंगळ वाढत्या लगाम लावण्यात यावा कितीतरी घटना घडल्या असून संबंधित विभाग अधिकाऱ्यांनी जाग येत नाही या दुर्लक्षित बे जबाबदार अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी रोडवर कोणतेच सूचनाफलक रोडवर कोणतीच निशाणी केली नाही उलट रोडवर मातीच्या ढिगाऱ्यांचे मलबा व किनार लागून सुरक्षितेसाठी संरक्षण कंपाउंड सुद्धा केले नाही या खड्ड्यावर आजपर्यंत दुर्लक्ष केले आहे,

सावरा ते आकोट या रोडवरील रोडचे निर्माण करण्याचे काम चालू असून रधारीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे त्यामुळे सर्व वाहनधारक प्रवासी सावरा ते वडाळी देशमुख ते पण अंजनगाव रोड मार्गे सुरक्षित प्रवास होण्याच्या दृष्टिकोनातून या खड्ड्याजवळून रहदारीचे मोठे प्रमाण वाढत आहे

खड्ड्यामुळे कितीतरी अपघात वाढतेच आहेत यामध्ये जर मनुष्य किंवा वन्यजीव प्राणी शेतकऱ्याची जनावरे पाणी पिण्याचे निमित्ताने जीवित हानी झाली याला जबाबदार लघु पाटबंधारे विभाग राहील असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे येत आहे ताबडतोब या बेवारस पाण्याच्या खड्ड्याचे काम करण्यात यावे अशी स्थानिक शेतकरी ग्रामस्थांची गावकऱ्यांची मागणी होत आहे.

सावरा ते आकोट रोडच्या काम मुळे पणज वरून अंजनगाव जाण्याकरता रात्र व दिवस मुख्य आणि शॉर्टकट रस्ता असून खड्डा अपघाताला आमंत्रण देत आहे.

**सौ स्वाती वैभव गुजरकर**
(सावरा प्रशासक सरपंच)

...............

बरेच महिन्यापासून खड्डा असुरक्षित खोदला असून प्रवाशांना माहिती फलक सूचना कुठेच दिसत नाही त्यामुळे अपघात वाढते आहेत रखडलेले तात्काळ काम मार्गी लावा.

**गजानन आकोटकर**
(पणज माजी उपसरपंच)

...............

लघु पाटबंधारे च्या भोंगळ कारभाराला नागरिक त्रस्त झाले तात्काळ खड्डे चे काम मार्गी न लागल्यास उग्र आंदोलन छेडण्यात येईल.

**कृष्णा रेवस्कर**
(वडाळी देशमुख इंजिनीयर)

# अनिता खंडेलवाल यांच्या निवासस्थानी समर कँप मस्ती की पाठशाळाचे आयोजन



**अकोला :** उन्हाळ्याच्या सुट्ट्या सत्कारणी लावण्यासाठी, लि. अनिताजी खंडेलवाल यांच्या निवासस्थानी मुलांसाठी भव्य 'समर कॅम्प' मस्ती की पाठशाळाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे या सर्जनशील शिबिराचा शुभारंभ ममता आणि वात्सल्याचे प्रतीक 'मातृ दिना'च्या पावन प्रसंगी झाला.

कार्यक्रमाची शोभा वाढवताना क्लब प्रेसिडेंटचे भावपूर्ण स्वागत करण्यात आले. तसेच, या यशस्वी आयोजनाच्या सूत्रधार कु. अंकिता खंडेलवाल यांचा सत्कार क्लब अध्यक्षा लि. राजश्री समनपुरे यांच्या हस्ते एक सुंदर रोपटे भेट देऊन करण्यात आला. ही भेट पर्यावरण संरक्षणाप्रती त्यांची बांधिलकी दर्शवते. शिबिरात मुलांनी मातीच्या माध्यमातून आपल्या कल्पनांना भरारी दिली आणि अत्यंत सुंदर कलाकृती निर्माण केल्या, जलसंवर्धनाबद्दल जनजागृती करण्यासाठी मुलांनी आकर्षक चित्रे काढली, कडक उन्हाळ्यात मुक्या पक्ष्यांची तहान भागवण्यासाठी '५ कुंडे' (मातीची भांडी) लि. भारती जी खंडेलवाल यांनी वाटली आणि मुलांना त्यांचे महत्त्व पटवून दिले. मुलांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ करण्यासाठी योगाभ्यास आणि उत्साहासाठी नृत्यचे विशेष वर्ग घेण्यात आले.

प्लास्टिकच्या वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी 'प्लास्टिक निर्मूलन' मोहिमेवर चर्चा करण्यात आली तसेच 'साइशा समनपूरे हिच्याकडून बनवलेल्या पिशव्या - वेस्ट टू बेस्ट' कला शिकवण्यात आली.

हे शिबिर केवळ मुलांच्या मनोरंजनाचे केंद्र नव्हते, तर त्यांना समाज आणि पर्यावरणाप्रती जबाबदार नागरिक बनवण्याच्या दिशेने एक प्रशंसनीय पाऊल ठरले.

# वारकरी शिक्षण संस्थेमधील प्रवेशाची निवड प्रक्रिया १२ जूनला



**अकोट :** आकोट स्वानंद सुखनिवासी सद्गुरु श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र आळंदी देवाची यांची मान्यता प्राप्त उपशाखा महाराष्ट्रात सर्वात प्रथम श्री क्षेत्र श्रद्धासागर येथील श्री संत वासुदेव महाराज वारकरी शिक्षण संस्था, आकोट येथे सुरू झाली आणि यामध्ये मागील वर्षी ३० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यावर्षी नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची निवड प्रक्रिया १२ जूनला होत आहे. वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ श्रेष्ठ महाराज मंडळी आणि शासन, प्रशासनाचे उच्चपदस्थ पदाधिकारी व अधिकारी यांच्या साक्षीने गत वर्षी या वारकरी शिक्षण संस्थेचा उद्घाटन सोहळा भव्य प्रमाणात श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे सानंद संपन्न झाला. या वारकरी शिक्षण संस्थेत प्रवेश घेण्याकरता अनेक विद्यार्थ्यांनी औपचारिक नोंदणी केलेली आहे. सर्व विद्यार्थ्यांची व इतर इच्छुक विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. वारकरी शिक्षण संस्थेत दोन विभागांमध्ये प्रवेश घेता येईल. पहिल्या विभागात निव्वळ वारकरी शिक्षण याकरिता विद्यार्थी किमान इयत्ता १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच, दुसऱ्या विभागामध्ये वारकरी शिक्षणासह शालेय शिक्षण घेण्याकरिता विद्यार्थी इयत्ता ७ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

# जनगणना कार्य करताना शिक्षकाचा मृत्यू




शिक्षक संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अकोला :** जनगणना राष्ट्रीय कार्य करताना शिक्षकाचा मृत्यू झाला. क्षेत्रीय कार्यालय उत्तर झोन अकोला महानगरपालिका अंतर्गत ॲग्लो उर्दू स्कुल येथील शिक्षक अरविंद जोध यांनी १५ रोजी जनगणनेचे कार्य करून दुपारी घरी आल्यावर त्यांची प्रकृती अत्यंत खराब झाल्यामुळे दवाखान्यात जात असतानाच मरण पावले.

शिक्षकाच्या दुर्देवी निधनामुळे परिवारातील कर्ता पुरूष निघुन गेला. त्यांच्या परिवारावर आर्थिकसह संकटे आली आहेत. तेव्हा अशा स्थितीत शिक्षकाच्या कुटुंबाला किमान ५० लाख रूपये आर्थिक सहाय्य प्राप्त व्हावे तसेच अनुकंपा तत्वावर त्वरीत कुटुंबातील सदस्याला नोकरी प्राप्त व्हावी, अशी मागणी केली. राष्ट्रीय कार्य करतांना सर्वच शिक्षक कर्मचाऱ्यांना विमा कवच लागू करण्यात यावे. प्रखर उन्हाळा व प्रतिकुल हवामानामूळे काम करतांना आरोग्याच्या दृष्टीने वेळा पत्रक करण्यात यावे म्हणजे भविष्यात अशा प्रकारची दुर्देवी घटना घडू नये. तसेच शिक्षकावर अतिरिक्त ताण येणार नाही याकरीता उपाययोजना करण्यात याव्यात. जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनेतर्फे सादर करण्यात आले. तेव्हा जनगणना ही राष्ट्रीय कार्य शिक्षक चांगल्या दर्जाने करीत आहेत आपल्या तर्फे हवामान वातावरण विचारात नियोजनात्मक कार्यवाही योग्य प्रकारे व्हावी अशी विनंती केली. साने गुरुजी प्राथ शिक्षक सेवा संघ, वि मा. शि तसेच अन्य संघटना चे पदाधिकारी उपस्थित होते.

## पातुर नगरपरिषद निवडणूक

# अंतिम दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करताना शहरात राजकीय वातावरण तापले

प्रतिनिधी २६ मे

**पातुर :** पातुर नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी शहरात विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. शहरातील मुख्य मार्ग, तहसील कार्यालय परिसर व निवडणूक कार्यालय परिसर घोषणाबाजी आणि पक्षांच्या झेंड्यांनी गजबजून गेला होता.

यावेळी काँग्रेस व शिवसेना उबाठा गटाच्या युतीने शक्तिप्रदर्शन करत उमेदवारांचे अर्ज दाखल केले. दोन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणाबाजी करत उमेदवारांनी आपली उमेदवारी दाखल केली. दुसरीकडे पातुर विकास आघाडी, भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे गट तसेच अनेक अपक्ष उमेदवारांनीही मोठ्या उत्साहात अर्ज दाखल केले. विविध पक्षांनी शहरात रॅली काढून आपली ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला.



नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून प्रत्येक पक्षाकडून विजयाचे दावे करण्यात येत आहेत. अंतिम दिवशी झालेल्या गर्दीमुळे तहसील कार्यालय परिसरात काही काळ वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली होती. पोलिस प्रशासनाकडून बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

आता उमेदवारी अर्ज छाननी आणि माघारीनंतर निवडणुकीचे खरे चित्र स्पष्ट होणार असून पातुर नगरपरिषद निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २६ मे २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# जुन्या वादातून ऑटो चालकाची हत्या; दोघांना अटक



प्रतिनिधी २६ मे

**यवतमाळ** : शहरालगतच्या मोठे वडगाव परिसरात जुन्या वादातून ऑटो चालकाची धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आल्याची घटना मंगळवारी सकाळी घडली. या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीसह एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे.

सय्यद वसीम सय्यद हबीब उर्फ 'मीठा चावल' (वय ३७, रा. मोठे वडगाव) असे मृताचे नाव आहे. तो ऑटो चालक म्हणून काम करीत होता.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास जुन्या वादाच्या कारणावरून सय्यद वसीम याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. स्थानिकांनी त्याला उपचारासाठी हलविण्याचा प्रयत्न केला; मात्र त्याचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी मंगेश चंपतराव कन्नाके (वय ४४, रा. मोठे वडगाव) याला अटक केली असून एका अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेतले आहे.

या घटनेमुळे मोठे वडगाव परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. गेल्या काही दिवसांत जिल्ह्यात गंभीर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने नागरिकांमध्येही चिंता व्यक्त केली जात आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## हरसुलमध्ये रुपाताई मानकर यांच्या पुतळ्याचे २८ मे रोजी अनावरण

प्रतिनिधी २६ मे

**दिग्रस** : हरसुल येथील राज्य शासनाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त माजी मुख्याध्यापिका रुपाताई नागसेन मानकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे



अनावरण २८ मे रोजी नागसेनवन येथे होणार आहे. या कार्यक्रमासाठी केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड आणि यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख उपस्थित राहणार आहेत.

हरसुल येथील ऐतिहासिक जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका असलेल्या रुपाताई मानकर यांचे १६ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. उपेक्षित व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या स्मरणार्थ आयोजित पुण्यानुमोदन कार्यक्रमात परित्तदेसना, संघदान, मान्यवरांची मनोगते व सहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात रुपाताई मानकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे लोकार्पण करण्यात येणार असून, त्यानंतर दिव्यांगांना विविध साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. रुपाताई मानकर या दिग्रस पंचायत समितीचे माजी सभापती मिलिंद मानकर तसेच रिपाइं (आठवले गट) जिल्हाध्यक्ष महेंद्र उर्फ सोना मानकर यांच्या मातोश्री होत. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मानकर परिवार व हरसुल ग्रामस्थांनी केले आहे.

# भरधाव टिप्परची दुचाकींना धडक; दोघे ठार



प्रतिनिधी २६ मे

**पुसद** : पुसद-माहूर मार्गावरील इंदिरानगर डम्पिंग ग्राउंड परिसरात रविवारी सकाळी भरधाव टिप्परने दोन दुचाकींना दिलेल्या धडकेत दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून जड वाहनांच्या बेदरकार वाहतुकीबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी साडेसात ते आठच्या सुमारास हिरो स्प्लेंडर (क्र. ७५७०) आणि हिरो पॅशन (क्र. ८३६०) या दुचाकी पुसदकडे येत होत्या. त्याचवेळी एमएच-२१/बीएच-३७६० क्रमांकाचा मालवाहू टिप्पर भरधाव वेगाने येत होता. इंदिरानगर डम्पिंग ग्राउंडजवळ टिप्पर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दोन्ही दुचाकींना जोरदार धडक बसली.





या अपघातात गणेश विष्णू जाधव (२९, रा. काटखेडा, ता. पुसद) आणि अरविंद प्रल्हाद राठोड (३५, रा. कोठारी, ता. महागाव) यांचा जागीच मृत्यू झाला. तर अनिता अरविंद राठोड (३५) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर पुसद येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. या प्रकरणी विष्णू कसना जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून टिप्पर चालक भारत शंकर पवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नगीना शेख करीत आहेत.

दरम्यान, शहरालगतच्या मार्गांवर भरधाव जड वाहनांमुळे अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांकडून कठोर वाहतूक नियंत्रणाची मागणी करण्यात येत आहे.

# अल्पवयीन मुलीचे विनयभंग

प्रतिनिधी २६ मे

**आर्णी** : गावातील एका चाळीस वर्षीय इसमाने अल्पवयीन मुलीचा घरातून हात धरून ओडत आणत विनयभंग केल्याची घटना आर्णी तालुका अंतर्गत येणाऱ्या अंबोडा येथे नऊ वाजताच्या सुमारास घडली असून फिडीत मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारी वरून आरोपी विरूध्द विविध गुन्हे दाखल करून अटक करण्यात आली आहे.

उदयसिंग जयसिंग राठोड 40 वर्ष राहणार अंबोडा असे विनयभंग केल्याप्रकरणी अटक करण्यात



आलेल्या अरोपीच नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार गावातील उदयसिंग राठोड यांचा गुराचा गोठा पिढीत मुलीच्या आई-वडिलांच्या शेजारी असून तो नेहमी त्या गुरांच्या गोठ्यावर नेहमी येत होता रात्रीच्या नऊ वाजता सुमारास पिडीत मुलीच्या घरी येऊन मुलीचा हात पकडून ओडत आणल्याचे पिडीत मुलीच्या आईने तक्रारीत नमूद केले आहे. लगेच पिडीत मुलीच्या आई बापाने पोलीस स्टेशन गाठून घडलेली घटना पोलिसांना सांगितली असता आर्णी पोलिसांनी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादी वरून आणि पिडीत मुलीच्या बयाना वरून आरोपी उदयसिंग राठोड याच्या विरुद्ध विविध गुन्हे दाखल केले.

दरम्यान आर्णी पोलिसांनी तात्काळ आरोपीला अटक केली आहे सदर कारवाई पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जमा.राजू रुद्रक्षवार, जमा. राजेश जाधव, अभय मिश्रा यांनी केली.

# डिझेल प्रश्नावर काँग्रेसचा ट्रॅक्टर मोर्चा; जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

प्रतिनिधी २६ मे

**यवतमाळ** : शेतकऱ्यांना कॅन व डबकीमध्ये डिझेल देण्यास पेट्रोल पंप चालकांकडून नकार दिला जात असल्याच्या निषेधार्थ काँग्रेसच्या वतीने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात हजारो शेतकरी, काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

शहरातील '2 पंजा सेलिब्रेशन हॉल' येथून सकाळी मोर्चाला सुरुवात





झाली. ट्रॅक्टर, डबकी आणि विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. शेती मशागतीच्या तोंडावर शेतकऱ्यांना डिझेल मिळण्यात अडचणी येत असल्याने प्रशासनाने तत्काळ हस्तक्षेप करून पेट्रोल पंपांवरून शेतकऱ्यांना डिझेल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचल्यानंतर प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष रमेश भिसनकार, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल उर्फ बबलु देशमुख यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. आंदोलकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला.

# एमआरपीसंदर्भात स्वतंत्र कायद्याची मागणी

## अभा ग्राहक पंचायत उमरखेड शाखेचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी २६ मे

**उमरखेड** : ग्राहकांच्या हिताचे संरक्षण व्हावे आणि शोषणमुक्त समाजाची निर्मिती व्हावी, यासाठी केंद्र शासनाने एमआरपी (कमाल किरकोळ किंमत) संदर्भात स्वतंत्र कायदा करावा, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, उमरखेड शाखेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भातील निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांना सोमवारी देण्यात आले.




निवेदनात म्हटले आहे की, सध्या विविध उत्पादनांवर छापण्यात येणाऱ्या एमआरपीसाठी स्पष्ट नियम नसल्याने उत्पादक, वितरक आणि विक्रेते अवास्तव दर आकारत आहेत. विशेषतः औषधे, वैद्यकीय उपकरणे, सौंदर्यप्रसाधने तसेच नामांकित कंपन्यांच्या उत्पादनांवर जास्तीची एमआरपी छापली जात असल्याने ग्राहकांची आर्थिक फसवणूक होत आहे.

केंद्र शासनाने स्वतंत्र कायदा तयार करून उत्पादनाची मूळ किंमत, त्यावरील कर तसेच अंतिम एमआरपी यांचा स्पष्ट उल्लेख पॅकिंगवर बंधनकारक करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती पंतप्रधान, केंद्रीय अर्थमंत्री, ग्राहक संरक्षण मंत्री यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार किसनराव वानखेडे आणि खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

यावेळी ग्राहक पंचायत शाखेचे अध्यक्ष प्रा. प्रकाश देशमुख, उपाध्यक्ष दत्ता गंगासागर, कार्यालय प्रमुख ॲड. विलासराव देवसरकर, कोषाध्यक्ष यशवंत गिरी, सहसचिव विजय सोनवणे तसेच कार्यकारिणी सदस्य भारत कुलकर्णी उपस्थित होते.

# एमआरपी व्यवस्थेत सुधारणा करा

## ग्राहक पंचायतचे पंतप्रधानांच्या नावे निवेदन

प्रतिनिधी २६ मे

**आर्णी** : सध्याची एमआरपी (कमाल किरकोळ किंमत) व्यवस्था ग्राहक संरक्षणाऐवजी आर्थिक शोषणाचे माध्यम बनत असल्याचा आरोप करीत अखिल भारतीय ग्राहक पंचायत, आर्णी शाखेच्या वतीने पंतप्रधानांच्या नावे नायब तहसीलदार प्रमोद गुल्हाने यांना निवेदन देण्यात आले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिल्हा यवतमाळच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पूर्वी वस्तूंवर 'रिटेल प्राईस प्लस लोकल टॅक्स' ही पद्धत लागू होती. विविध राज्यांतील करांमधील फरकामुळे ग्राहकांना वेगवेगळ्या किंमती द्याव्या लागत होत्या. ही विसंगती दूर करण्यासाठी वस्तूंवर एमआरपी अंकित करणे बंधनकारक करण्यात आले. मात्र, आता उत्पादक कंपन्या कोणत्याही स्पष्ट कायदेशीर मर्यादेशिवाय मनमानी पद्धतीने अवास्तव एमआरपी छापत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ग्राहक पंचायतने प्रत्येक उत्पादनावर एमआरपीसोबत उत्पादन खर्च नमूद करणे बंधनकारक करावे, अशी मागणी केली आहे. तसेच उत्पादक कंपन्यांकडून एमआरपी निश्चितीवर कायदेशीर निर्बंध आणून "योग्य व न्याय्य कमाल किंमत" निश्चित करण्यासाठी स्वतंत्र वैधानिक



प्राधिकरण स्थापन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

औषधे, अन्नपदार्थ आणि दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंवर विशेष नियंत्रण व्यवस्था लागू करावी. ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या उत्पादक व विक्रेत्यांवर कठोर दंडात्मक कारवाईची तरतूद करावी. संसद व विधानसभांमध्ये या विषयावर चर्चा घडवून आवश्यक कायदेशीर दुरुस्त्या तातडीने करण्यात याव्यात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ग्राहकांच्या आर्थिक शोषणाला आळा घालण्यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी ग्राहक पंचायतने केली आहे. ग्राहकांना वस्तूच्या वास्तविक उत्पादन खर्चाची माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्यांना छापील कमाल किंमत देण्यास भाग पाडले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत गेल्या चार दशकांपासून प्रत्येक उत्पादनावर उत्पादन खर्च नमूद करण्याची मागणी करीत आहे. विशेषतः औषधे, सौंदर्यप्रसाधने आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंमध्ये उत्पादन खर्चाच्या तुलनेत अनेक पटींनी अधिक एमआरपी आकारली जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

या वेळी शाखाध्यक्ष लक्ष्मीकांत राठी, उपाध्यक्ष राजेश माहेश्वरी, सचिव अजय छलाणी, अजाबराव बुटले, जयंत डोल्हारकर, श्रीकृष्ण जावळकर यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. निवेदनाच्या प्रती केंद्रीय उद्योग मंत्री व ग्राहक व्यवहार मंत्र्यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# मुकुटबनमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

## दहावी-बारावीतील यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन प्रोत्साहन

प्रतिनिधी २६ मे

**झरी जामणी** : मुकुटबन मित्रपरिवार व खेतानी फाउंडेशन, झरी जामणी यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी व बारावी परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवारी (दि. 23) महावीर भवन, मुकुटबन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश म्याकलवार होते. उद्घाटक म्हणून झरी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा शीलाताई चौधरी उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून झरी पंचायत समितीचे माजी सभापती भुमारेड्डी बाजन्लावार, निसर्ग पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र गेडाम, शिवसेना शिंदे गटाचे नेते चंद्रकांत घुग्गुल, माजी मुख्याध्यापक रामदास पाईलवार, राज्य विक्रीकर सहाय्यक जगदीश भगत, ममता पारखी, रमेश उदकवार, गजभिये सर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते वीस गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच नुकतेच तलाठी पदावर नियुक्त झालेले स्वप्निल चिंतामण पथाडे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात राज्य विक्रीकर सहाय्यक जगदीश भगत यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, करिअर नियोजन व यशासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संजय आकीनवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन नागेश अक्केवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जगदीश गोर्लेवार, अरुण चिंतावार, अरुण चिटलावार व सुरेंद्र गेडाम यांनी सहकार्य केले.

# मुकुटबन परिसरात अवैध धंद्यांचा विळखा

प्रतिनिधी २६ मे

**झरी** : मुकुटबन पोलीस स्टेशन हद्दीत मटका, झेंडीमुंडी, अवैध दारू विक्री, गुटखा तस्करी, गांजा विक्री व जनावर तस्करीसारखे अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या धंद्यांना स्थानिक पोलिसांचे संरक्षण मिळत असल्याचा गंभीर आरोप होत आहे.

मुकुटबन हे औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे व तालुक्यातील मोठे गाव मानले जाते. परिसरात बाहेरील राज्यांतील कामगार मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. या कामगारांची अवैध धंदेवाल्यांकडून आर्थिक लूट होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मुकुटबन येथे सध्या तीन मटका काउंटर व तीन झेंडीमुंडी काउंटर सुरू असून दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या ठिकाणी वारंवार वाद, भांडणे व हाणामारीच्या घटना घडत असल्याचेही सांगण्यात येत आहे.

वणी येथील काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून हे अवैध व्यवसाय चालविले जात असून स्थानिक तरुणांना धमक्या व शिवीगाळ केली जात असल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे गावातील शांतता भंग झाली असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

ग्रामस्थांच्या मते, मुकुटबनला नवीन बीट जमादार नियुक्त झाल्यानंतर अवैध धंद्यांमध्ये वाढ झाली आहे. अडेगाव, गणेशपूर, कोसारा, डोंगरगाव, बोपापूर, सुरला, खडकडोह, निमणी, सोनेगाव, खातेरा आदी गावांमध्ये अवैध दारू विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मुकुटबन व घोन्सा परिसरात मटका व झेंडीमुंडीचे जाळे वाढल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

तसेच कोरपणा व वणी परिसरातून सुगंधी गुटख्याची तस्करी होत असल्याचा आरोप असून तेलंगण सीमावर्ती भागातून जनावरांची अवैध वाहतूक सुरू असल्याचेही सांगण्यात आले. मुकुटबन परिसरात गांजा विक्री वाढल्याने अल्पवयीन मुलांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि. २६ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## सोमवारी 'डाक अदालत'चे आयोजन

**अमरावती:** भारतीय डाक खात्याच्या वतीने अमरावती विभागातील ग्राहकांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यासाठी सोमवार, दि. २ जून रोजी सकाळी ११ वाजता प्रवर अधीक्षक डाकघर कार्यालयात 'डाक अदालत' आयोजित करण्यात आले आहे. या डाक अदालतीमध्ये प्रामुख्याने स्पीड पोस्ट, नोंदणीकृत पार्सल, काऊंटर सेवा, बचत बँक खाते आणि मनीऑर्डर यांसारख्या सेवांशी संबंधित तक्रारी विचारात घेतल्या जातील. विशेषतः अशा तक्रारी, ज्यांचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसेल किंवा ज्यांना विभागाकडून समाधानकारक उत्तर मिळाले नसेल, अशा प्रकरणांची दखल येथे घेतली जाणार आहे. तक्रारदारांनी आपला अर्ज सादर करताना त्यामध्ये मूळ तक्रार केल्याची तारीख, संबंधित अधिकाऱ्याचे नाव व पद, आणि तक्रारीचा संपूर्ण तपशील नमूद करणे आवश्यक आहे. हे अर्ज 'प्रवर अधीक्षक डाकघर, अमरावती विभाग, अमरावती - ४४४६०२' यांच्या नावे पाठवावेत.

# मोदी सरकारकडून जनतेची निर्लज्ज लुट !

## ◆ पेट्रोल-डिझेलच्या ८ रुपयांच्या दरवाढीचा तीव्र निषेध! ◆ इंधन टंचाईमुळे जनसामान्य नागरिकांचे हाल;काँग्रेस आक्रमक!

प्रतिनिधी २६ मे

**अमरावती :** केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या भाजप सरकारने केवळ गेल्या चार दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात तब्बल ८ रुपयांची भयंकर वाढ केली आहे. ही वाढ ही सर्वसामान्य जनतेची सरळसरळ आर्थिक लूट असून, महागाईच्या आगीत जनतेला जिवंत जाळण्याची मोदी सरकारची कुटील नीती आहे.मागील आठवड्यात इंधनाच्या किंमतींमध्ये झालेल्या प्रचंड वाढीमुळे राज्यभर महागाईचा भडका उडाला आहे. शहरांमध्ये तर ग्रामीण भागातही पेट्रोल आणि डिझेलची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे.पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागल्या आहेत.शहरातील नागरिकांना रोजच्या कामधंद्यासाठी इंधन मिळत नसल्याने अत्यंत कठीण परिस्थिती निर्माण




झाली आहे.हे मोदी सरकार शेतकरी, मजूर आणि मध्यमवर्गीयांच्या हालअपेष्टांकडे डोळेझाक करत आहे. केवळ उद्योगपती आणि कॉर्पोरेट मित्रांचे हित सांभाळण्यासाठी जनतेच्या खिशातून लूट चालवली जात आहे.ही अन्यायकारक, जनविरोधी आणि असंवेदनशील धोरणे आहेत.अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने आज मंगळवार, दिनांक २६ मे २०२६ रोजी या अन्यायकारक दरवाढी व इंधन टंचाईच्या निषेधार्थ निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.काँग्रेस पक्ष स्पष्ट इशारा देत आहे की, राज्यातील इंधन टंचाई तात्काळ दूर न झाल्यास आणि पेट्रोल-डिझेलच्या दरात कपात न केल्यास काँग्रेस पक्ष राज्यभर अधिक तीव्र, आक्रमक आणि सातत्यपूर्ण आंदोलन छेडेल.रस्त्यावर उतरून जनतेच्या वेदना व्यक्त करण्यासाठी काँग्रेस तयार आहे.याद्वारे मोदी सरकारला स्पष्ट संदेश आहे की, जनतेच्या जिवावर उठू नका! महागाई आणि टंचाईचा बळी जनता होणार नाही.काँग्रेस पक्ष जनतेच्या पाठीशी भक्कमपणे उभा आहे.

ठमोदी सरकार मुर्दाबाद!
जनता लुटणारे मुर्दाबाद -
ठठपेट्रोल-डिझेल महागाई,
मोदी सरकार हटाओ!
ठमोदी जनता की लूट बंद करो,
जनता की आवाज सुनो!
ठलूट का बाजार बंद करो,
मोदी सरकार हटाओ!

ठकिती लुटणार मोदी? -- आता बस्स करो मोदी!ठ या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.याप्रसंगी प्रामुख्याने काँग्रेस शहराध्यक्ष बबलु शेखावत, मनपा विरोधीपक्ष नेते विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, नगरसेवक विक्की वानखडे, युवक काँग्रेसचे निलेश गुहे, नितीन काळे, अनिकेत ढेंगळे, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, विनोद मोदी, राजेंद्र वर्मा, संजय चौधरकर, सलीम मिरावाले, अरुणकुमार जैस्वाल, अशोक डोंगरे, अभिनंदन पेंढारी, गजानन जाधव, गजानन राजगुरे, विठ्ठल मरापे, संजय बोबडे, अमोल उगे, अरुण बनारसे, संदेश सिंघई, शिल्पा राऊत, कांचन खोडके, शिरीन खान, जयश्री मरापे, किरण चांदवडकर, डॉ.अर्चना आत्राम, प्रथमेश गावंडे, अनिकेत क्षीरसागर, चेतन खोपे, कार्तिक कडुकर, मयुर तायडे, सतीश गवई, प्रीतम ठाकूर, प्रकाश नगराळे, शेखर सुरमवार, अशफाक खान, रफीक भाई चिकुवाले, राजाभाऊ हाडोळे, अनिकेत ढेंगळे, सुरेश रतावा, राजीव भेले, प्रशांत महल्ले, प्रदीप अरबट, ज्ञानेश्वर झोंबाडे, दिनेश खोडके, विजय वानखडे, नाना बारबुद्धे, गजानन रडके, मोहन पुरोहित, श्रीधर पुरोहित यांच्या सह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महापौर श्रीचंद तेजवानी यांची सिटी बस संदर्भात चर्चा

## अमरावतीत सिटी बस सेवा पूर्ववत सुरू राहणार

प्रतिनिधी २६ मे

**अमरावती:** शहर सिटी बस सेवेच्या कंत्राटदाराचा करार संपत असल्याच्या पार्श्वभूमीवर आज सोमवार दि. २५ मे २०२६ रोजी अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांनी स्व. सुदामकाका देशमुख सभागृह येथे महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, गटनेता शेख हमीद शेख वाहेद, नगरसेवक




ॲड.प्रशांत देशपांडे, सिटी बस सेवा प्रतिनिधी उपस्थित होते.

शहर बस सेवेचा विद्यमान कंत्राट कालावधी संपत असल्याने पुढील कार्यवाही कशा प्रकारे करावी याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील हजारो नागरिक दररोज सिटी बस सेवेचा वापर करत असल्याने ही सेवा अखंडित सुरू राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. विशेषतः कामगार, विद्यार्थी, महिला व सर्वसामान्य नागरिकांसाठी सिटी बस सेवा ही अत्यावश्यक सुविधा असल्याने कोणत्याही परिस्थितीत सेवा बंद पडू नये, यावर भर देण्यात आला.

दरम्यान, सध्या आचारसंहिता लागू असल्याने सिटी बसच्या नव्या करारासंदर्भातील प्रक्रिया व निर्णय तत्काळ घेणे शक्य नसल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विद्यमान व्यवस्थेतच सिटी बस सेवा सुरू ठेवण्याचा सुचना देण्यात आल्या.

महापौर श्रीचंद तेजवानी यांनी यावेळी नागरिकांची गैरसोय होणार नाही याची विशेष काळजी घेण्याच्या सूचना दिल्या. बसची नियमितता, वेळापत्रक आणि प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधांमध्ये कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी सतर्क राहावे.

# अमरावतीत लप्पीभैयांच्या वाढदिवसानिमित्त भव्य सोहळा

## ३००० हून अधिक नागरिकांची उपस्थिती

प्रतिनिधी २६ मे

**अमरावती :** अंबानगरीतील लोकप्रिय समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया उर्फ लप्पीभैया यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. हरिगंगा द लेक एटिट्यूड, छत्री तलाव, अमरावती येथे आयोजित या कार्यक्रमाला ३००० हून अधिक नागरिकांची उपस्थिती लाभली. सामाजिक, धार्मिक, राजकीय तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लप्पीभैया व त्यांच्या परिवाराने उपस्थित सर्व संत-महंतांचे पारंपरिक पद्धतीने




पाय धुऊन, शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले. उपस्थित संतांनी लप्पीभैयांच्या सेवाभावी कार्यांचे कौतुक करत त्यांना शुभ आशीर्वाद व साधुवाद दिला.

कार्यक्रमाला शक्ती पीठ काली माता चे पीठाधीश्वर शक्तीजी महाराज, इस्कॉनचे मधुपतीदास महाराज, निलेशचंद्र जैन मुनी महाराजजी, किशन साईजी महाराज, महानुभाव पंथाचे राष्ट्रीय अध्यक्ष कारणजेकर बाबा, सीता दीदी, शिवधारा आश्रमाचे गौतमजी महाराज, सागरजी देशमुख महाराज तसेच मुरारीलालजी महाराज यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी विधानपरिषद आमदार संजयजी खोडके, अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिनजी भेड़े, माजी मंत्री जगदीशजी गुप्ता, अनिल अग्रवाल, नगरसेवक विलासजी इंगोले, गोविंदभाऊ कासट मित्र परिवार, सुमतीताई ढोके, अशोक जैन, किशोर गोयंका, सिटी न्यूजचे संपादक चंदू सोजतिया, नानकभैया नेभनानी, अमोल इंगले, अरुणजी पडोळे, प्रवीण दिधाते, नानकभैया आहुजा, विनोद कालांतरी, कमलकिशोर मालानी, पतंजली अमरावतीचे योगेश राठी, संजय तीर्थकर, प्रशांत देशपांडे, संजय खंडेलवाल, अशोक जाजू आदी मान्यवर उपस्थित होते.

# बाल स्वास्थ्य कार्यक्रमात ८७९ बालकांना जीवदान

## ४ हजार ५४७ इतर शस्त्रक्रिया यशस्वी

प्रतिनिधी २६ मे

**अमरावती:** राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम हा जिल्ह्यातील हजारो बालकांना आशेचा किरण ठरला आहे. या महत्त्वाकांक्षी उपक्रमात गंभीर आजारग्रस्त असलेल्या बालकांना नवजीवन देण्यात आले आहे. मागील काही वर्षांत जिल्ह्यात ८७९ हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या आहे. याशिवाय ४ हजार ५४७ इतर शस्त्रक्रिया करून गरजू कुटुंबांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. या सर्व शस्त्रक्रियांसाठी बालकांच्या पालकांना एक रुपयाही खर्च करावा लागलेला नाही.

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. अंगणवाडी ते शाळा स्तरावरील प्रत्येक बालकापर्यंत पोहोचून संपूर्ण बालकांचे स्क्रीनिंग करण्यात आले आहे. दुर्गम भागातही आरोग्य सेवा पोहोचवून आजारांचे वेळेत निदान करणे ही या योजनेची खरी ताकद ठरली आहे. योजनेत जन्मजात हृदय रोग, जन्मजात नेत्र रोग, जन्मजात कर्णदोष, दुभंगलेले ओठ व टाळू, हर्निया व हायड्रोसील, डोळ्यांचा तिरळेपणा, दंतरोग, फायमोसीस, हाडांचे इतर आजार आणि टॉन्सिल्स या प्रमुख शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या मोहिमेत नामवंत रुग्णालयांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. यात अमरावती येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. पाटील कान, नाक, घसा हॉस्पिटल, आचार्य विनोबा भावे रुग्णालय, सावंगी, कोकिळाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल, मुंबई, एसआयसीसी चिल्ड्रन हॉस्पिटल, मुंबई, नेल्सन हॉस्पिटल, नागपूर, किम्सवे हॉस्पिटल, नागपूर, स्वास्थम हॉस्पिटल, नागपूर आणि संजीवनी हॉस्पिटल, मुंबई यांनी प्रमुख शस्त्रक्रिया केली. जिल्हा पातळीवर कार्यरत असलेल्या पथकांमार्फत तालुकास्तरावर बालकांना मोफत सेवा पुरविली जात आहे. जिल्ह्यातील बालकांना दुर्धर आजार असल्यास या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी केले आहे.

# चांदुर रेल्वे पोलीसांची गोवंश वाहतूकिवर धडक कारवाई

प्रतिनिधी २६ मे

**चांदुर रेल्वे :** पोलीस स्टेशन चांदुर रेल्वे येथे, २५/०५/२०२६ रोजी गुम बातमीदाराकडून माहीती मिकाली की मालखेड रेल्वे येये अवेध गोवंश वाहतूक होत आहे अश्या चात्रीलायक बातमीवरन आम्ही मालखेड रेल्वे येये रवाना होवुन माकावंवी केली असता आम्हाता एक वाहन आमचे दिशेने येतांना दिसले. आम्ही सदर बाहन भांवबुन शहानिशा केली असता त्यामध्ये ०५ गोवंश आतीचे जनावरांची वाहतुक होत असल्याचे दिसुन आले सदर वाहनाची पाहणी करुन घटनास्यवी



दोन पंचांना बोलबुन वाहणाची वारकाईने पाहणी केली असता एक मालवाडु वाहन क्र. श्प् ०६ॅ ३९७७ असे त्यामध्ये ०५ गोवंशीय जातीचे जनावरे निर्दयतेने बाबुन कुठलीही चारा पाण्याची व्यवस्था न करता भरसेचे दिसुन आले. घदर वाहन चालकाला आम्ही त्याचे नाव चिचारले अतता त्याचे त्याचे याव मोहम्मद मासीर वय ३२ वर्ष, रा.चांदुर रेल्वे जि. अमरावती थवे सांगितले वरून त्यांना वाहणाने कागदपत्र व गोवंशीय जनावरे वाहतुक करण्याचे कागदपत्र मागीतले असता त्यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र नसल्याचे भांगीतले. सदर वाहनामध्ये निर्दयतेने बांबुन भरलेले गोवंशीय जनावरांची पाहणी केली असता मालवाडु वाहन क श्प् ०६ॅ ३९७७ कि.बं. ५,००,०००/- रुपये, एक ६ॅ इथ्ळए कंम्पीना मोबाईल कि.बं. १०,०००/-रुपये, व ०५ पोवंश जातीचे जनावरे कि.बं. ५६,००० असा एकुन ५,६६,०००/- रुपये चा याल ताब्यात घेतला असून पुढील कावदेशीर कारवाई करीत आहे.

# मतदारयाद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहीम

## जूनपासून प्रत्यक्ष पडताळणीला सुरुवात

प्रतिनिधी २६ मे

**अमरावती:** भारत निवडणूक आयोगाने संपूर्ण देशात मतदार याद्यांचे 'विशेष सखोल पुनरिक्षण' घेण्याचे आदेश दिले आहेत. या मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर झाला आहे. यात महाराष्ट्राचा समावेश आहे. या मोहिमेत राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

देशात यापूर्वी १९५२ ते २००४ दरम्यान विविध वर्षांमध्ये अशी मोहीम राबवण्यात आली होती. मात्र, मागील २० वर्षांत केवळ 'विशेष संक्षिप्त पुनरिक्षण' घेण्यात आले असून 'विशेष सखोल पुनरिक्षण' झालेले नाही. या काळात झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. अनेक मतदारांनी नवीन ठिकाणी नाव नोंदवले, पण जुन्या ठिकाणचे नाव वगळले नाही. परिणामी मतदारयाद्यांमध्ये दुबार नावे वाढली असण्याची शक्यता असल्याने ही पडताळणी केली जात आहे.

राज्यातील क्षेत्रीय यंत्रणा सध्या जनगणनेच्या कामात व्यस्त असल्याने निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासाठी स्वतंत्र वेळापत्रक निश्चित केले आहे. ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबर २०२६ मध्ये पूर्ण होईल. २० ते २९ जून दरम्यान गणना अर्जांची छपाई आणि बीएलओ यांचे प्रशिक्षण. ३० जून ते २९ जुलै दरम्यान 'बीएलओ' घरोघरी जाऊन गणना अर्ज वाटप करतील व भरलेले अर्ज परत घेतील. ५ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान प्रारुप यादीवर दावे व हरकती नोंदवणे. ३ ऑक्टोबरपर्यंत दावे व हरकती निकालात काढणे. ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार याद्यांची प्रसिद्धी करण्यात येणार आहे.

राज्यातील एकूण ९ कोटी ८६ लाख ४४ हजार ४१३ मतदारांच्या तपशिलाची खातरजमा १ लाख २५३ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत केली जाईल. ३० जून ते २९ जुलै या कालावधीत 'बीएलओ' घरोघरी जाऊन आधीच माहिती भरलेले 'गणना प्रपत्र' मतदारांना देतील. यात मतदाराची सध्याची माहिती तसेच २००२-२००४ मधील जुनी माहिती भरलेली असेल किंवा ती मतदाराला स्वतः भरता येईल. मतदारांना ही जुनी माहिती निवडणूक आयोगाच्या न्दॉ.म्ग़ुदन्.ग्ह या संकेतस्थळावरूनही मिळवता येईल. मतदारांना हे गणना प्रपत्र ऑनलाइन पद्धतीनेही भरण्याची सुविधा उपलब्ध असेल. गृहभेटीदरम्यान घर बंद आढळल्यास अधिकारी किमान ३ वेळा भेट देतील.

# महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम' मागे न घेतल्यास राज्यव्यापी जनआंदोलन छेडणार !

## अमरावतीतील प्रमुख मंदिरांचा निर्धार

प्रतिनिधी २६ मे

**अमरावती :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल आणि वन विभागाने प्रस्तावित केलेला 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६' हा राज्यातील सहस्रो हिंदु देवस्थानांचे स्वायत्त अस्तित्व आणि त्यांच्या उत्पन्नाचे स्रोत मुळापासून उखडून टाकणारा आहे. या कायद्याच्या मसुद्यात अत्यंत गंभीर कायदेशीर त्रुटी असून तो हिंदु देवस्थानांच्या धार्मिक आणि मालमत्ता अधिकारांवर थेट घाला घालणारा आहे. या देवस्थान मालक हक्कविरोधी मसुद्याचा आम्ही तीव्र निषेध करत असून तो सरकारने विनाशर्त मागे घ्यावा, अशी मागणी मराठी पत्रकार भवन, अमरावती येथे येथे आयोजित पत्रकार परिषदेत मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप जैस्वाल यांनी केली.

जर सरकारने हा हिंदूविरोधी कायदा रेटण्याचा प्रयत्न केला, तर संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, अशी चेतावणीही या प्रसंगी अनुप जयस्वाल यांनी दिली. या प्रसंगी सनातन संस्थेचे धर्मप्रसारक संत पु. अशोक पात्रीकर, अंबादेवी देवस्थानचे विश्वस्त




अधिवक्ता राजेंद्र पांडे हिंदू जनजागृती समिती ,अमरावती समन्वयक श्री.सचिन वैद्य आशा मनीषा देवस्थान दर्यापूरचे विश्वस्त श्री .निलेश जटाळे , महारुद्र हनुमान मंदिर, जहांगीरपुरचे अध्यक्ष श्री.ओमप्रकाश परतानी , श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान, सावंगा विठोबाचे अध्यक्ष पुंजाजी नेमाडेउपस्थित होते.

वक्फ मालमत्तांना विशेष संरक्षण, तर मंदिरांच्या भूमी बळकावण्यासाठी कायदा हा दुजाभाव निषेधार्ह श्रीकांत पिसोळकर हिंदू जनजागृती समिती

सार्वजनिक 'महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०' अन्वये कायद्यानुसार देवस्थानची 'मूर्ती' 'कायदेशीर व्यक्ती' मानली जाते. भूमींची मालकी देवतेकडे असते; मात्र प्रस्तावित कायद्यानुसार ही सर्व इनामे रहित करून भूमी वहिवाटदार किंवा पुजारी यांच्या नावे 'मालक' म्हणून वर्ग करण्याचा प्रयत्न चालू आहे. यामुळे पिढ्यानपिढ्या मंदिरांच्या सेवेसाठी वापरल्या जाणाऱ्या भूमींचे व्यापारीकरण होऊन भविष्यात मंदिरे परावलंबी होतील. मसुदा सिद्ध करण्यापूर्वी सरकारने नैसर्गिक न्याय तत्त्वांचा विचार केलेला नाही. यात मंदिरांना बाजू मांडण्याची संधी देण्यात आलेली नाही. ज्यांनी देवस्थानांना इनाम म्हणून भूमी दिलेल्या आहेत, त्या मंदिरांचा उदरनिर्वाह चालावा म्हणून दिलेल्या आहेत. हा कायदा केवळ हिंदु मंदिरांसाठी लागू केला असून तो अन्य धर्मियांसाठी लागू नाही. त्यामुळे हे 'निधर्मी' व्यवस्था असणाऱ्या देशात कसे घडू शकते? वक्फ मालमत्तांना विशेष संरक्षण दिले जात असतांना मंदिरांच्या भूमी बळकावण्यासाठी कायदा करणे, हा दुजाभाव निषेधार्ह आहे. हा प्रस्तावित कायदा म्हणून बहुसंख्य हिंदूंवर आघात आहे. त्यामुळे हा प्रस्तावित कायदा शासनाने मागे घ्यावा.''

याप्रसंगी अंबादेवी संस्थान अमरावतीचे विश्वस्त अधिवक्ता राजेंद्र पांडे म्हणाले की ठप्रस्तावित अधिनियमामुळे राज्यातील देवस्थान इनाम भूमींचे अस्तित्व धोक्यात येणार आहे. मंदिरांच्या मालकीच्या भूमी कब्जेदार, मिरासदार, पुजारी किंवा अन्य धारकांच्या नावावर जाण्याचा मार्ग मोकळा होईल. यामुळे मंदिरांचे पारंपरिक उत्पन्नाचे स्रोत संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाली आहे. मसुद्यातील काही कलमांद्वारे अनधिकृत धारकांना किंवा दीर्घकाळ कह्यात असलेल्या व्यक्तींना भूमींचे हक्क देण्याचे प्रावधान असल्याने मंदिरांच्या मालमत्तेवर अतिक्रमण करणाऱ्यांना कायदेशीर संरक्षण मिळेल.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि २६ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## मतदारयाद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहीम...



**वाशीम :** भारत निवडणूक आयोगाने संपूर्ण देशात मतदार याद्यांचे 'विशेष सखोल पुनरिक्षण' घेण्याचे आदेश दिले आहेत. या मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर झाला आहे. यात महाराष्ट्राचा समावेश आहे. या मोहिमेत राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. देशात यापूर्वी १९५२ ते २००४ दरम्यान विविध वर्षांमध्ये अशी मोहीम राबवण्यात आली होती. मात्र, मागील २० वर्षांत केवळ 'विशेष संक्षिप्त पुनरिक्षण' घेण्यात आले असून 'विशेष सखोल पुनरिक्षण' झालेले नाही. या काळात झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. अनेक मतदारांनी नवीन ठिकाणी नाव नोंदवले, पण जुन्या ठिकाणचे नाव वगळले नाही. परिणामी मतदारयाद्यांमध्ये दुबार नावे वाढली असण्याची शक्यता असल्याने ही पडताळणी केली जात आहे.

## भ्रष्ट शासन, धान्याचे राशन, दुकानदाराचे पोषण, गरीबांचे शोषण

# नियम डावलून अनागोंदी, वारसाच्या नावे दुकानाच्या नोंदी !

***पिढ्यांपिढ्या एकाच कुटुंबात राशन दुकान * बनले गावात गोरगरीबांना लुटण्याचे मकान *पुरवठा विभाग भ्रष्टाचाराचे ठिकाण**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शासनाच्या वतीने गरीबांना स्वस्त धान्य पुरवठा केल्या जातो, त्यासाठी जिल्हा पुरवठा विभागामार्फत राशन दुकानदारांच्या वतीने धान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात येते. मात्र, या यंत्रणेला भ्रष्ट अधिकारी माफिया व दुकानदारांनी सुरंग लावला आहे. राशनचा काळाबाजार जगजाहीर होत असतांना भ्रष्ट शासन धान्याच्या राशनातून दुकानदाराचे पोषण करीत असून गरीबांचे शोषण करीत आहेत. वर्षानुवर्ष एकाच घरात वारसाच्या नावे नोंदी करीत असल्याचे उघड झाले आहे. अनुकंपाचा व वारसाचा असा कोणताच नियम नसतांना नियम डावलून जिल्ह्यात शेकडो दुकानदारांना त्यांच्या वारसाच्या नावे दुकानाच्या नोंदी करून दुकाने चालवित असल्याचे उघड झाल आहे. नियमानुसार कार्यकाळ संपल्यानंतर आता बचत गटांना राशन दुकान देण बंधनकारक असतांनाही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी रास्त धान्य दुकानदारांच्याच वारसाच्या नावे नोंदी केल्याचे उघड झाले आहे. जिल्हा पुरवठा विभागाच्या अजब गजब कारभाराचा नियम डावलून अनागोंदी प्रकार अंगलट येणार आहे.













तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी व तात्कालीन तहसीलदार रिसोड यांनी उपलब्ध दुकानाचा नवीन परवाना मृत वारसदाराच्या वारसाला देताना करावयाच्या सहा अटींमध्ये रास्त धान्य दुकानदाराच्या फेवरला माहिती देऊन परवाना त्यांच्या वारसाच्या नावे करावयासाठी ज्या गोष्टी होत्या त्या गोष्टीला एक प्रकारची अर्थपूर्ण साथ दिलेली आहे कर्मचारी सेवानिवृत्त होताना त्यांचे वय ५८ वर्षे झाल्यावर त्यांना सेवानिवृत्त केल्या जाते परंतु ६५ वर्ष होऊनही व गेल्या दोन-तीन पिढ्यापासून चालत आलेला रास्तधान्य दुकानाचा परवाना हा आपल्या पुढच्या पिढीला देऊन त्यांचा जीवनभराचा उदरनिर्वाह प्रश्न कायम स्वरुपी करण्याचे मुख्य साधन हे स्वस्त धान्य दुकान बनले आहे स्वस्तधान्य दुकानदाराकडे करोडोची संपत्ती असून त्यांच्याकडे किराणा दुकान, कृषी सेवा केंद्र, फहार्डवेअर, पेट्रोल पंप, जेसीबी, ट्रॅक्टर, कॉन्ट्रॅक्टर, कुटुंबातील काही लोक नोकरीला असून अन्य उत्पन्नाचे

### नावालाच अनुकंप...
### भ्रष्टाचाराचा अंत, दुकानदार जिवंत

आपल्या वारसाला दुकान मिळण्यासाठी दुकानदार जिवंत असतांना नियम डावलून भ्रष्ट अधिकाऱ्यांशी संगणमत करून अनुकंपाचा कोणताही नियम नसतांना जिल्हयातील शेकडो राशन दुकानदारांनी आपल्या वारसाच्या नावे दुकानाच्या नोंदी केल्याचे प्रकार पुराव्या निशी सिटी न्युज सुपरफास्टच्या हाती लागले आहेत.

साधन असताना तहसीलदार यांनी त्यांच्या सहा मुद्द्यांमधील पाचव्या मुद्द्यावर सदर वारसांच्या उदरनिर्वाह हा रास्त धान्य दुकानावरच अवलंबून आहे अशा प्रकारची माहिती दिलेली आहे यावरून हे लक्षात येते की ह्या सर्व गोष्टी संगणमताने करून पुढील पिढीच्या उत्पन्नाचे साधन दुकानदार यांनी तयार करून ठेवलेले आहे त्यामध्ये रिसोड तालुक्यातील पांडुरंग लक्ष्मण कोकाटे मोरगव्हान व अजाबराव बाबुराव देशमुख मोठेगाव या व इतर शेकडो दुकानदाराचा समावेश असून असेच ५० टक्क्याहून अधिक दुकाने ही रिसोड तालुका व जिल्ह्यात वारसाच्या नावे चुकीच्या नोंदी देऊन करण्यात आलेले आहेत तरी संपूर्ण बाबीची रीतसर चौकशी करून खोटी माहिती जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना देणाऱ्या स्वस्त धान्य दुकानदार व त्यांच्या वारसावर करण्यात यावी व त्यांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करून नव्याने जाहिरात काढून गरजवंतांच्या गटाला व सेवा सहकारी संस्थांना दुकाने देण्यात यावी अशा प्रकारची मागणी जनतेतून होत आहे.

## थोडक्यात

### वाय. सी. सी. बी. एस. इ. शाळेत 'विद्यार्थी सारथी सन्मान



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

वाय. सी. सी. बी. एस. इ. स्कूलमध्ये तसेच वाय. सी. फॅमिलीच्या वतीने ड'विद्यार्थी सारथी सन्मान सोहळा'ड मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. डविद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी व प्रवासासाठी मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्व सारथींचे (वाहन चालक व वाहक ऑटो रिक्षा) आभार मानण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य संजीव कुमार सिंह यांनी सर्व सारथींचे सुमानांनी सहर्ष स्वागत केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी सारथींच्या अमूल्य सेवेची व कर्तव्याची भरभरून प्रशंसा केली. तसेच सर्व सारथींना त्यांच्या निरंतर सहकार्याबद्दल सन्मानार्थ विशेष स्नेह भेट म्हणून परिधान आणि पाणी बॉटल देऊन गौरविण्यात आले. ह्या सोहळ्याचे औचित्य साधून विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन शाळा परिवहन समिती तयार करण्यात आली. हा सोहळा यशस्वी आणि देखणा करण्यासाठी शाळेच्या संपूर्ण शिक्षक वृंदाने मोलाचे सहकार्य व परिश्रम घेतले.

### बेरोजगार तरुणांसाठी कार्यशाळा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना स्वयंरोजगाराची मोठी संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे एका विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी पशुपालन हा उत्तम पर्याय असून, याअंतर्गत शेळीपालन, कुक्कुटपालन आणि दुग्धव्यवसाय या तीन प्रमुख विषयांवर ५ दिवसांचे सखोल मार्गदर्शन दिले जाणार आहे. या प्रशिक्षणात केवळ पशुपालनाची तांत्रिक माहितीच नाही, तर प्रत्यक्ष व्यवसाय कसा उभा करावा, याचे उद्योजकता विकासाचे धडेही तज्ज्ञांकडून दिले जाणार आहेत.

## एम.आर.पी. करा कायदा, ग्राहकांचा करा फायदा !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विविध वस्तूवर जास्तीत जास्त कमाल किरकोळ किंमत (एम.आर.पी.) मुद्रणावर मर्यादा घालण्यासाठी केंद्र शासनाने स्वतंत्र कायदा करावा आणि ग्राहकांचे सद्या सुरू असलेले आर्थिक शोषण थांबविण्याची मागणी वाशीम जिल्हा ग्राहक पंचायतच्यावतीने देशाच्या पंतप्रधानांना येथील जिल्हाधिकाऱ्या मार्फत दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पंतप्रधानांना जिल्हाधिकाऱ्यां मार्फत पाठविलेल्या निवेदनात अखिल भारतीय ग्राहक पंचायत, वाशीम जिल्ह्याच्या वतीने ग्राहक संरक्षणासाठी सुरू करण्यात आलेली कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) प्रणाली आता ग्राहकांची फसवणूक करण्याचे माध्यम बनली आहे. सद्या कोणत्याही उत्पादनावर कितीही एमआरपी छापण्यास स्पष्ट मर्यादा




नसल्याने उत्पादक, वितरक आणि विक्रेते मनमानी दर छापत आहेत. त्यामुळे ग्राहकांना विविध कंपन्यांकडून अवाजवी दर आकारल्या जात असल्याने ग्राहकांची फसवणूक आणि मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण सुरु असल्याची बाब या निवेदनात नमूद केली आहे. तसेच उत्पादन खर्चाच्या तुलनेमध्ये अनेक पटीने एमआरपी छापुन नंतर ग्राहकांना मोठ्या सवलती दाखविल्या जातात. त्यामुळे ग्राहकांना प्रत्यक्षात किती किंमत योग्य आहे याची माहिती मिळत नाही. प्रामुख्याने औषधे, वैद्यकिय उपकरणे, सौंदर्य प्रसाधने, किटकनाशके आणि नामांकित कंपनीच्या वस्तुंमध्ये ही समस्या गंभीर स्वरूपात असल्याचेही या निवेदनात स्पष्ट केलेले आहे. महानगरासह जिल्हास्तरावरील व्यावसायिक संकुलामध्ये जास्त एमआरपी असलेली उत्पादने ऑनलाईन खरेदीमध्ये कमी दरात उपलब्ध होत असल्याने ग्राहक संभ्रमात पडत आहेत. देशातील सर्व ग्राहकांना आर्थिक शोषणापासून व

### ग्राहक पंचायतची मागणी

फसवणूकीपासून मुक्त करण्यासाठी केंद्रशासनाने एमआरपी संदर्भात स्वतंत्र कायदा करण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

२२ मे रोजी वाशीम जिल्हा ग्राहक पंचायतचे अध्यक्ष जुगलकिशोर कोठारी, कार्यालय प्रमुख प्रांजल जैन, प्रचार प्रमुख आतीश देशमुख यांनी निवासी उपजिल्हाधिकारी रविंद्र काळे यांना देण्यात आले. या निवेदनाच्या प्रती देशाच्या अर्थमंत्री, वाणिज्य व उद्योग मंत्री, ग्राहक संरक्षण मंत्री यांना पाठविल्या आहेत. मे महिन्यात राष्ट्रीय स्तरापासून ग्रामिण भागात अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्यावतीने जनजागृती अभियान कार्यक्रम राबवून ग्राहकांची फसवणूक आणि आर्थिक शोषण बंद करण्यासाठी ग्राहक पंचायत पुढाकार घेत आहे.

## बोलीभाषांच्या संवर्धनातूनच अभिजात मराठी अधिक समृद्ध होईल -डॉ. किरण कुलकर्णी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मराठी ही केवळ एक भाषा नसून तब्बल २०० हून अधिक बोलीभाषांचे समृद्ध भाषाकुल आहे. या बोलीभाषाच मराठीचे मूळ असून त्यातूनच मराठी अधिक समृद्ध झाली आहे. त्यामुळे अभिजात मराठी भाषा अधिक सक्षम आणि व्यापक करण्यासाठी विविध बोलीभाषांचे संवर्धन करणे ही आजची खरी गरज आहे, असे प्रतिपादन मराठी भाषा विभागाचे सचिव तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले.

वाशिम जिल्हा प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने आयोजित वासंतिक व्याख्यानमालेच्या समारोपीय सत्रात ते बोलत होते. यावेळी साहित्य, भाषा, संस्कृती आणि मराठीच्या जतन-संवर्धनाविषयी त्यांनी



अभ्यासपूर्ण आणि परखड विचार मांडले.

डॉ. कुलकर्णी म्हणाले की, जगामध्ये सुमारे साडेसहा हजार भाषा बोलल्या जातात आणि त्यामध्ये मराठी भाषेचा पहिल्या दहामध्ये समावेश होतो, ही मराठी भाषेच्या अभिजाततेची मोठी पावती आहे. मात्र, आज अनेक बोलीभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. या बोलीभाषांमधील शब्द, म्हणी, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक ठेवा जतन करणे अत्यंत आवश्यक आहे. हरवत चाललेले शब्द संकलित करून त्यांचे डिजिटल दस्तावेजीकरण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

## मंगरूळपीर तालुक्यात कोतवाल बुकाच्या नक्कलीचा गोंधळ !

***१३६ पैकी फक्त २७ गावांचीच ऑनलाईन सुविधा *डिजिटल महाराष्ट्राच्या घोषणा फोल**

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

शासनाच्या डिजिटल महाराष्ट्राच्या घोषणा होत असताना ही मंगरूळपीर तालुक्यात कोतवाल बुकाच्या नक्कली साठी नागरिकांना आज ही कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. तालुक्यातील एकूण १३६ गावां पैकी केवळ २७ गावांचीच कोतवाल बुकाची नक्कल ऑनलाईन उपलब्ध असून उर्वरित १०९ गावांतील नागरिकांना अजून ही ऑफलाईन प्रक्रिये वर अवलंबून राहावे




लागत असल्याने डिजिटल महाराष्ट्राची घोषणा फोल ठरत आहे त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

कोतवाल बुकाची नक्कल ही जमीन व्यवहार, वारस नोंद, शासकीय

> तालुक्यातील बहुतांश गावांची कोतवाल बुकाची नक्कल अजूनही ऑनलाईन मिळत नाही. त्यामुळे आम्हाला वारंवार तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. डिजिटल सेवेच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जात असल्या तरी ग्रामीण भागातील वास्तव मात्र पूर्णपणे वेगळे आहे. शासनाने केवळ घोषणा न करता प्रत्यक्षात सर्व गावांची सेवा ऑनलाईन सुरू करून दिलासा द्यावा.'
>
> **– समाधान चंपत भगत , सामाजिक कार्यकर्ते सनगाव ता. मंगरूळपीर**

योजना, बँक कर्ज प्रकरणे तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या विविध कागदपत्राकरिता आणि विविध कायदेशीर कामांसाठी महत्त्वाची मानली जाते. मात्र बहुतांश गावांची नोंद ऑनलाईन प्रणालीमध्ये उपलब्ध नसल्याने नागरिकांना तहसील कार्यालय व संबंधित महसूल विभागाच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. विशेष म्हणजे अनेक वेळा अर्ज करूनही 'रेकॉर्ड उपलब्ध नाही', 'सर्व्हर बंद आहे', 'अधिकारी बाहेर आहेत' अशी उत्तरे मिळत



असल्याने नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दिवसाचे कामधंदे सोडून अनेकदा कार्यालयात जावे लागत असल्याने आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

एका बाजूला शासन सर्व सेवा डिजिटल करण्याचा दावा करत असताना दुसऱ्या बाजूला तालुक्यातील तब्बल १०९ गावांतील नागरिकांना कोतवाल बुकाची साधी नक्कल मिळवण्यासाठीही त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे उर्वरित गावांची माहिती तातडीने ऑनलाईन करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## मॅनेज निविदा, भ्रष्टाचाराची सुविधा !

***रिसोड नगरपरिषदेच्या वार्षिक निविदा वादाच्या भोवऱ्यात *निविदा रद्द करण्याची मागणी**

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड येथील नगरपरिषदेच्या वार्षिक निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करून निविदा रद्द करण्याची मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे अध्यक्ष तथा पत्रकार प्रभाकर पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे एका निवेदनाद्वारे केली असल्यामुळे रिसोड नगरपरिषदेच्या वार्षिक निविदा ( टेंडर )वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

निवेदना मध्ये नमूद करण्यात आले आहे की, रिसोड नगरपरिषदेच्या सन २०२६-२७ च्या वार्षिक निविदा प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याची माहिती दोन वेळा काढण्यात (प्रसारित)आलेल्या निविदेवरून व दि. २१ मे रोजी उघडण्यात आलेल्या निविदा वरून समोर आली आहे, दैनंदिन खप असलेल्या वृत्तपत्रांमध्ये निविदा प्रसारित करण्यात आल्या नाहीत, निविदा सीलबंद डब्यामध्ये स्वीकारण्यात आल्या नाहीत, मोजक्याच नगरसेवकांना बोलावून कार्यालयीन वेळेच्या नंतर निविदा उघडण्यात आल्या, पुरवठादारांना बोलावण्यात आले




नाही, त्यामुळे मुख्याधिकारी यांनी नियम व अटींचे उल्लंघन करून काही नगरसेवक तसेच त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने निविदा मंजूर केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. नगरसेवक हे लोकप्रतिनिधी असून त्यांनी स्वतः अथवा त्यांच्या निकटवर्तीयांच्या माध्यमातून नगरपरिषदेची कंत्राटे घेणे हे हितसंबंधांचा संघर्ष निर्माण करणारे आहे. यामुळे निविदा प्रक्रियेची पारदर्शकता व निष्पक्षता बाधित झाली असून इतर पात्र ठेकेदारांवर अन्याय झाला आहे. नगरसेवकांनी स्वतःच्या किंवा नातेवाईकांच्या नावे निविदा घेतल्या असल्याचे उघड झाले असून त्यास मुख्याधिकारी यांनी मान्यता दिली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे त्यामुळे महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम महाराष्ट्र सार्वजनिक खरेदी नियमावली व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदीची उल्लंघन झाले आहे सदर प्रकरणात निविदा अटी, पात्रता निकष व मंजुरी प्रक्रिया यांची सखोल चौकशी करून सदर वार्षिक निविदा रद्द करण्यात याव्या अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे तसेच

संपूर्ण निविदा प्रक्रियेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. निविदा प्राप्त करणाऱ्या नगरसेवक व त्यांच्या नातेवाईकांची माहिती सार्वजनिक करण्यात यावी. नियमभंग झाल्याचे आढळल्यास संबंधित मुख्याधिकारी, अधिकारी व लाभार्थींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. आवश्यक असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग व लेखापरीक्षण यंत्रणेमार्फत विशेष चौकशी करण्यात यावी. अशीही मागणी पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे काल दिनांक २५ मे रोजी केली आहे. सदर निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम, विभागीय आयुक्त, अमरावती .संचालक, नगर प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य. मुंबई यांना पाठविण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी काय कार्यवाही करतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## शेतकऱ्यांवर शेत रस्त्यावरून हल्ला !





### रिसोड नगर परिषद गट नेते यांच्यावर गुन्हा दाखल

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

शहरालगतच्या असलेल्या शिंगाळा परिसरात शेतरस्त्याच्या जुन्या वादातून दोन शेतकऱ्यांवर लोखंडी रॉड आणि दगडांनी हल्ला झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या प्रकरणी रिसोड नगर परिषद गटनेत्यासह तिघांविरुद्ध रिसोड पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना २३ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास घडली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, असनगल्ली येथील कैलास मधुकर सरोदे (वय ३७) यांनी रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, शिंगाळा

### लोखंडी रॉड आणि दगडांनी मारहाण

वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपींनी कैलास सरोदे व सतीश सरोदे यांच्यावर लोखंडी रॉड आणि दगडांनी हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मारहाणीत दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रिसोड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

परिसरात त्यांची व त्यांच्या नातेवाईकांची शेती असून शेताकडे जाणाऱ्या रस्त्यावरून दोन्ही गटांमध्ये मागील काही दिवसांपासून वाद सुरू होता. दरम्यान, शेत मशागतीचे काम सुरू असताना आरोपी कृष्णा लिंगप्पा आसनकर, चेतन हर्षवर्धन आसनकर आणि सोहम राम आसनकर हे घटनास्थळी पोहोचले. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, याच शेतरस्त्याच्या वादावरून यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता. घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
मंगळवार, दि. २६ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## कीर्तनाला निघालेल्या महिलेला दुचाकीची धडक

**दुचाकी चालकाविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल**

**नांदुराः** शहरातील नांदुरा मलकापूर मार्गावरील संचेती ले-आऊट परिसरात कीर्तन ऐकण्यासाठी पायी जाणाऱ्या एका महिलेला भरधाव दुचाकीने धडक दिल्याची घटना १६ मे रोजी रात्री सर्व्हिसिंग सेंटरसमोर घडली होती. या अपघातात महिला गंभीर जखमी झाली. या प्रकरणी नांदुरा पोलिसांनी तक्रारीवरून २४ मे रोजी दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणपतीनगर (दूध डेअरी रोड) येथील राहुल रघुनाथ खडे (३३) यांनी याबाबत तक्रार दिली. त्यांची आई सुनिता रघुनाथ खडे (५३) या मैत्रिणी निर्मला चोपडे व आशा मिरगे यांच्यासह संचेती ले-आऊट परिसरातील कीर्तन कार्यक्रमासाठी पायी जात होत्या. दरम्यान, नांदुरा मलकापूर रोडवरील सर्व्हिसिंग सेंटरसमोर त्या रस्त्याच्या कडेला उभ्या असताना नांदुऱ्याकडून मलकापूरकडे भरधाव दुचाकीची (क्रमांक एम. एच. २८, सीए ८४७६) त्यांना जोरदार धडक दिली.

# नाल्यात कचरा टाकल्यास कारवाई; न.प. चा इशारा

### खामगावात मान्सूनपूर्व नाले सफाईला सुरुवात

प्रतिनिधी २६ मे

**खामगावः** पावसाळ्यात शहरात पाणी साचू नये, नैसर्गिक नाल्यांमधून पाण्याचा निचरा सुरळीत व्हावा यासाठी खामगाव नगर परिषदेकडून शहरात मान्सूनपूर्व नालेसफाईला सुरूवात करण्यात आली आहे. तसेच यापुढे नाल्यात कचरा टाकल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.येत्या काही दिवसात शहरातील नालेसफाईची कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या मुख्य नाल्यासह अनेक प्रभागातून लहान मोठे असें ८ ते १० नाले वाहतात. या नाल्यांमधील कचऱ्यामुळे पाणी तुंबण्याच्या घटना घडू नये यासाठी पालिकेकडून दरवर्षी नालेसफाई केली जाते.



तसेच शहरात दररोज घंटागाडी व ट्रॅक्टरव्दारे कचरा संकलन करून डम्पींग ग्राउंडवर कचरा टाकला जातो. मात्र गेल्या काही वर्षांपासून काही नागरिक, व्यापारी, खाद्य पदार्थ विक्रेते, चौपाटी वरील दुकानदार चक्क नाल्यांमध्ये कचरा, शिळे अन्न टाकत असल्याने निदर्शनास आले आहे. दरम्यान या कचरामुळे नाले तुडुंब भरतात आणि परिसरात दुर्गंधी आणि डासांचा प्रादुर्भाव होतो. तसेच पावसाच्या पाण्याचा निचराही वेगाने होऊ शकत नाही आणि शहरात पुरपरिस्थिती निर्माण होणे पर्यावरणाचे नुकसान व आरोग्याचे धोके निर्माण होत असून नाले सफाईवर होणारा खर्च देखील वाया जात आहे. त्यासाठी नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी जबाबदार नागरिक म्हणून वागणे गरजेचे आहे.

कचरा टाकण्यासाठी तीन ठिकाणी ट्रॅक्टरची सुविधा काही नागरिक सवयीमुळे, वेळेचे नियोजन न झाल्यामुळे किंवा गैरसोयीमुळे उघड्यावर कचरा टाकतात.

तसेच अनेकदा घंटागाडी अवेळी आल्यामुळे नागरिक कचरा साचवून न ठेवता उघड्यावर टाकून देतात. दरम्यान आता नागरिकांच्या सुविधेसाठी पालिका प्रशासनाने शहरातील तीन प्रमुख ठिकाणांवर कचरा संकलनाची व्यवस्था केली आहे. शहरातील फरशी, बसस्थानक व महात्मा गांधी बगिचा या ठिकाणी दररोज दुपारी २ वाजेपासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ट्रॅक्टर उभे राहणार असून नागरिकांनी या ट्रॅक्टरमध्ये कचरा टाकावा व शहराच्या स्वच्छतेसाठी हातभार लावावा, असे आवाहनन. प. प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

> स्वच्छ, सुंदर आणि आदर्श शहर बनविण्यासाठी खामगाव नगर परिषद प्रशासनाचे प्रयत्न आहेत. कचरा संकलनासाठी शहरात घंटागाडी व ट्रॅक्टरची व्यवस्था असताना काही नागरिक नाले व उघड्यावर कचरा टाकताना निदर्शनास येत आहे. यापुढे नाल्यात आणि उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर पालिका प्रशासनाकडून महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ व घन कचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत थेट कायदेशिर कारवाई दाखल करण्यात येईल.
>
> **प्रशांत शेळके,**
> मुख्याधिकारी खामगाव

# मलकापूर शहर पो.उप.नि नरेंद्र सिंग ठाकूर यांची दादागिरी

### तक्रारीची प्रत जिल्हा पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांना पाठविल्याने कारवाई कडे लक्ष

प्रतिनिधी २६ मे

**मलकापुरः** शहर पोस्टमध्ये कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक नरेंद्रसिंग कल्याण सिंग ठाकूर यांनी परिवारासह राजस्थान फिरून आल्यावर ट्रॅव्हल्स चालकाचे उर्वरित पैसे दिले नाही ठाकूर यांना पैसे मागितले असता मी पोलीस उपनिरीक्षक पदावर आहे माझं कोणीच काही करू शकत नाही तुमच्या कडून जे होईल ते करुन घ्या...यापुढे गाड्यांचा धंदा करावयाचा आहे की असे धमकाविल्याने संबंधित ट्रॅव्हल्स चालकाने याबाबतची तक्रार शहर पोस्टेला आज दि. २५ मे २६ रोजी दिली आहे, तक्रारीत नमूद केले आहे की मी कैफियतदार वैभव राजेंद्रसिंग राजपुत वय ३१ रा.वडोदा पानाचे ता.मुक्ताई नगर,जि.जळगांव येथे राहत असून मी व माझा भाऊ नामे गजेंन्द्रसिंग राजेंन्द्रसिंग राजपुत असे एकत्रीत राहतो, एकत्रीतच गाडया भाड्याने देण्याचा व्यवसाय करतो, सदर व्यवसाय हा मीच पाहतो, माझा भाऊ हा चालक म्हणुन काम करतो आमच्याकडे चार टॅक्सी परमीट गाड्या असुन त्या भाडयाने देवुन आम्ही आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो मलकापुर येथे शहर पोलिस स्टेशन मध्ये पोलिस उप निरीक्षक या पदावर कार्यरत असणाऱ्या नरेंद्रसिंह कल्याणसिंह ठाकूर यांनी ५ नोव्हेंबर २५ रोजी आमच्याशी संपर्क साधुन आमची विस सिटर टॅम्पो ट्रॅव्हलर गाडी ही २८/- रूपये प्रति किलोमीटर प्रमाणे बुक करून त्याच दिवशी त्याने रक्कम रू. ५००/-अग्रीम म्हणून फोन पे व्दारे जमा सुध्दा केले होते, त्याप्रमाणे, १५ नोव्हेंबर २५ रोजी आमची टैम्पो टॅव्हलर गाडी क्र.उ३०१०९७७४ ही गाडी आमचा ड्रायव्हर नामे शुभम मारोडे रा. तेल्हारा ता तेल्हारा जि अकोला हा राजस्थान येथे गैरकैफियतदार याचे सांगण्यावरून पर्यटनासाठी राजस्थान गेला होता. त्यानंतर २३ नोव्हेंबर २५ रोजी सदर गाडी ही परत आली असता सदर गाडीचे भाडयापोटी गैरकैफियतदार याच्याकडे एकूण रक्कम रू.७८४००/-बाकी होते. त्यापैकी ४९०००/-दिले असुन गैरकैफियतदार याच्याकडून रक्कम रू.२९४००/-अद्याप पावेतो घेणे बाकी आहेत.

वास्तविकता गाडी बुक करते वेळी, गाडीचे भाडयाची रक्कम देण्याची संपूर्ण जबाबदारी गैरकैफियतदार याने स्विकारली होती. थोडक्यात म्हणजे गैरकैफियतदार याने आमचा विश्वास संपादन करून आमची गाडी बुक करून तिचा वापर करून आमची भाडयाची राहीलेली रक्कम रु.२९४००/- देण्यास नकार देवून आमची धोक्याने, कपटाने व लबाडीने फसवणुक केली आहे तसेच गैरकैफियतदार हा पोलिस खात्यात उपनिरीक्षक पदावर असल्यामुळे तुम्ही माझे काहीही करू शकत नाही तुमच्या कडुन होईल ते करून घ्या असे सुध्दा गैरकैफियतदार याने आम्हास कळविले आहे तसेच मी पोलिस मध्ये असुन तुम्हास यापुढे गाड्यांचा धंदा करावयाचा आहे की नाही असे सुध्दा त्याने धमकावुन सांगितले आहे.तरी मे. साहेबांना विनंती की, वरील सर्व कारणासाठी गैरकैफियतदार याने केलेल्या गैरकृत्याबाबत व गुन्हाबाबत त्याचे विरूध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी व आम्हाला न्याय देण्यात यावा अशी मागणी तक्रारी द्वारे वैभव राजेंद्रसिंह राजपूत यांनी केली आहे.

# शिवीगाळ करत मजुरांवर हल्ला; १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

### गवळी रोड परिसरातील घटनाः तिघे जण जखमी

प्रतिनिधी २६ मे

**खामगावः** तालुक्यातील गवळी रोड परिसरात मजुरांवर हल्ला करून जातिवाचक शिवीगाळ केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी १० ते १२ अनोळखी इसमांविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गणेश जनार्धन वानखडे (४९, रा. बाळापूर फैल, खामगाव) हे २४ मे रोजी सायंकाळी पिंप्री गवळी रोड परिसरातून जात असताना टेंभुर्णा येथील काही जण त्यांच्याकडे धावत येताना दिसले. आरोपींनी नावाची विचारणा करून फिर्यादी व त्यांच्यासोबत असलेल्या मजुरांना काठ्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, जीव वाचविण्यासाठी फिर्यादी व मजूरू बुलढाणा वेअरहाउस परिसरात गेले असता, तेथेही आरोपींनी पाठलाग करून जातिवाचक शिवीगाळ केली, तसेच धमकी देत हल्ला केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या मारहाणीत फिर्यादी गणेश वानखडे, त्यांचा मुलगा अर्जुन वानखडे रघुनाथ बारसकर व चेतन विटे हे जखमी झाले. जखमींवर उपचार करण्यात आले असून, वैद्यकीय अहवालानंतर खामगाव ग्रामीण पोलिसांनी शनिवारी रात्री आरोपी सागर रमेश टिकार व त्याचा भाऊ (दोन्ही रा. टेंभुर्णा ता. खामगाव), तसेच इतर १० ते १२ अनोळखी व्यक्तींविरोधात भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमांसह अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदांतर्गत गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# दोन दिवसांत विद्युत पुरवठा सुरळीत न केल्यास आंदोलन

### शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांचा इशारा

प्रतिनिधी २६ मे

**मलकापुरः** तालुक्यातील देवदाबा येथील स्मशानभूमी जवळील विनोद पाचपोळ डीपी वरील पोल झुकल्याने या पोल वरील विद्युत पुरवठा गेल्या महिनाभरापासून बंद असल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील उसाचे पिके जळून जात आहे, सद्यस्थिती पेरणीचे दिवस असून विहिरीत पाणी उपलब्ध असूनही विद्युत पुरवठा खंडित असल्याने पिकांना पाणी देता येत नसल्याने शेतकऱ्यांपुढे आर्थिक संकट उभे ठाकले आहे, याबाबत म.रा.वि.वि कंपनीला संबंधित शेतकऱ्यांनी दोन-तीन वेळा लेखी व तोंडी तक्रारी करून सुद्धा म.रा.वि. वि



कंपनीने दुर्लक्ष केल्याने याबाबतची माहिती शेतकऱ्यांनी शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांना दिल्याने आज दि. २५ मे २६ रोजी देवधाबा येथील शेतकऱ्यांसह उपकार्यकारी अभियंता खान यांचे कार्यालय गाठून त्यांना याबाबत निवेदन देऊन दोन दिवसात देवधाबा येथील शेतकऱ्यांचे काम मार्गी न लागल्यास कंपनी कार्यालयातच आमरण उपोषण करण्याचा इशारा गजानन ठोसर यांनी दिला आहे. निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर,अतुल बाजोळे, नामदेव माळी, ऋत्विक सोनवणे, नरेंद्र बोरसे, शिवप्रसाद निळे, प्रतीक माळी, एकनाथ सपकाळ, संजीव सोनवणे, एकनाथ माळी, राहुल बोरसे, गजानन बोरसे, संजय बोरसे, ईश्वर बोरसे सह शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.

# युगप्रवर्तक डॉ. हेडगेवार' महानाट्यातून राष्ट्रभक्तीचा संदेश

प्रतिनिधी २६ मे

**खामगावः** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या जीवनकार्यावर आधारित 'युगप्रवर्तक डॉ. हेडगेवार' या महानाट्याचा ४६ वा प्रयोग शनिवार, २३ मे रोजी सायंकाळी जी. व्ही. मेहता नवयुग विद्यालयाच्या मैदानात उत्साहात पार पडला. नादब्रह्म, नागपूर निर्मित या महानाट्याद्वारे राष्ट्रभक्ती, संघटन आणि हिंदू समाज जागृतीचा संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व कु. प्राजक्ता हसबनीस यांनी सादर केलेल्या वंदेमातरम् गीताने झाली. मंचावर प्रमुख अतिथी महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर होते. यावेळी रा. स्व. संघाचे बुलढाणा विभाग संघचालक चित्तरंजन राठी, खामगाव अर्बन को-ऑप. बँकेचे अध्यक्ष विजयराव पुंडे तसेच खामगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश तायडे उपस्थित होते.

महानाट्यातून लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, योगी अरविंद आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विचारांचा डॉ. हेडगेवार यांच्या कार्यावर झालेला प्रभाव प्रभावीपणे सादर करण्यात आला. ब्रिटिशांनी त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून शिक्षा सुनावल्याचा प्रसंगही प्रेक्षकांना भावूक करून गेला.

रा. स्व. संघाची स्थापना, स्वयंसेवकांचे चारित्र्य निर्माण, मोहिते वाडा येथे संघ कार्याची सुरुवात तसेच भगवा ध्वजाला गुरूस्थानी मानण्याची परंपरा या घटनांचे चित्रण नाट्यात करण्यात आले. तसेच सुभाषचंद्र बोस आणि माधवराव गोळवलकर यांच्याशी संबंधित प्रसंगांनाही प्रेक्षकांची विशेष दाद मिळाली.

संघ सृजन या नाट्य आविष्काराचे संरक्षक ज्येष्ठ प्रचारक रविजी भुसारी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

महानाट्याचे निर्माते पद्माकर धानोरकर, लेखक डॉ. अजय प्रधान, दिग्दर्शक सुबोध सुर्जीकर, संगीतकार शैलेश दाणी व प्रचारप्रमुख रवींद्र सहस्त्रबुद्धे आहेत. डॉ. हेडगेवार यांची भूमिका सतीश खेकाळे यांनी तर गुरुजींची भूमिका अजय तेलपांडे यांनी साकारली.

विभाग कार्यक्रमाला सहकार्यवाह विजय निमकर्डे, जिल्हा संघचालक बाळासाहेब काळे, तालुका संघचालक संतोष देशमुख, नगर संघचालक प्रल्हाद निमकंडे तसेच नगराध्यक्षा अपर्णा फुंडकर यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन शेखर कुलकर्णी यांनी केले. तर आभार खामगाव अर्बन बँकचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला खामगाव, शेगाव, जळगाव जा, संग्रामपूर, मलकापूर, नांदुरा तालुक्यातील संघप्रेमी नागरिक, स्वयंसेवक बंधू व माननीय संघचालक उपस्थित होते.

# ह.भ.प. वैकुंठवासी प्रभाकरराव बाबुराव केवारे यांच्या पुण्यस्मरणनिमित्य भक्ती महोत्सव

प्रतिनिधी २६ मे

**खामगांव :** ह.भ.प. वैकुंठवासी प्रभाकरराव बाबुराव केवारे यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्य प्रभुव्दार निवास जिजाऊ पार्क, छत्रपती शिवाजी महाराज नगर, खामगांव येथे आज दि. २६ मे २०२६ पासून भव्य श्रीमद भागवत भक्ती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे प्रमुख मार्गदर्शक श्री. ह. भ. प. संजय महाराज

पाचपोर, गुप्तेश्वर आश्रम, शिर्ला नेमाने हे आहेत तर भागवत कथा प्रवक्ते श्री. ह.भ.प. मंगेश महाराज वराडे, दाताळकर हे आहेत. या सप्ताहामध्ये दररोज महाराष्ट्रातील विविध नामवंत किर्तनकारांचे किर्तन होणार असून आज मंगळवार दि. दि. २६ मे रोजी ह.भ.प. तुकाराम महाराज, सखारामपुर, बुधवार, दि. २७ मे रोजी ह.भ.प. शिवा महाराज बावस्कार, गाडेगांव, गुरुवार दि. २८ मे रोजी श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाघ, वारी हनुमान, शुक्रवार दि. २९ मे रोजी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, केज , शनिवार दि. ३० मे रोजी ह.भ.प.विशाल महाराज खोले, काकोडा, मुक्ताईनगर, रविवार दि. ३१ मे रोजी ह.भ.प. उमेश महाराज दशरथे, मानवत, सोमवार दि. ०१ जून रोजी ह.भ.प.मंगेश महाराज वराडे, दाताळकर तसेच दि. २ जून रोजी ह.भ.प.संजय महाराज पाचपोर, गुप्तेश्वर आश्रम यांचे काल्याचे किर्तन सकाळी ९ ते १२ राहील.

सप्ताह दरम्यान दररोज पहाटे ५ ते ६ काकडा आरती, दुपारी १ ते ५ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ व रात्री ८ ते १० श्रीहरी किर्तन असे कार्यक्रम होणार असून पुर्णाहुती अधिक वद्य मंगळवार दि. ०२ जून रोजी होणार असून त्यानंतर दुपारी १२ ते ३ दरम्यान महाप्रसादाचे वितरण केले जाणार आहे. त्यापुर्वी सकाळी ८ ते ११ ग्रंथ दिंडी प्रदक्षिणा होणार आहे. या सप्ताहात गायन सम्राट ह.भ.प. अमोल महाराज माळेकर, आळंदी देवाची, गायन सम्राट ह.भ.प. संतोष महाराज संबळे, आळंदी देवाची व ताल सम्राट ह.भ.प.मंगेश महाराज जाधव, आळंदी देवाची हे देखील आपली सेवा देणार असून टाळकरी मंडळी - अंत्रज, उमरा, रामनगर, विहीगांव, घाटपुरी, किन्ही महादेव, दिवठाणा, हिवरखेड, व पंचक्रोशितील टाळकरी उपस्थित राहणार आहे. तरी सर्व धर्मानुरागी भाविकांनी श्री.ह.भ.प. वै. प्रभाकरराव बाबुराव केवारे यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्य केवारे परिवारा कडुन आयोजीत श्रीमद भागवत कथा तथा किर्तन महोत्सवास उपस्थित राहुन सप्ताहाचे शेवटचे दिवशी महाप्रसादाचा लाभ घ्यावा व आम्हास उपकृत करावे अशी विनंती आयोजक दिपक प्रभाकरराव केवारे, सचिन प्रभाकरराव केवारे, नितिन प्रभाकरराव केवारे, योगेश प्रभाकरराव केवारे तथा समस्त केवारे परिवार खामगांव यांनी केली आहे.

# इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसचे आंदोलन

### पेट्रोल-डिझेल दर नियंत्रणात आणण्याची मागणी

प्रतिनिधी २६ मे

**नांदुराः** पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या सातत्याने वाढणाऱ्या दरांविरोधात, तसेच इंधनाच्या अपुऱ्या पुरवठ्याच्या निषेधार्थ काँग्रेसतर्फे सोमवार, २५ मे रोजी तहसील कार्यालयात आंदोलन करण्यात आले. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आमदार राजेश एकडे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.यावेळी तहसील प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

वाढत्या इंधन दरामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक जीवन कठीण झाले असून, वाहतूक खर्च, शेती उत्पादन खर्च आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. याचा थेट परिणाम शेतकरी, कामगार, गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांवर होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच अनेक भागांत पेट्रोल व डिझेलचा अपुरा पुरवठा होत असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दाही आंदोलकांनी उपस्थित केला.

केंद्र व राज्य सरकारकडून या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत आंदोलकांकडून सरकारच्या धोरणांविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

> **अशा आहेत मागण्या**
> **शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार** डिझेल व पेट्रोल उपलब्ध करून द्यावे, शेतीसाठी रासायनिक खतांचा वाजवी दरात पुरवठा करावा, इंधनावरील अतिरिक्त कर कमी करावेत आणि महागाई नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील, माजी आमदार राजेश एकडे, विजयसिंह राजपूत, आशा गोंड, तालुकाध्यक्ष भगवान धांडे, पुरुषोत्तम झाल्टे, नीलेश पाउलझगडे, शंकर एकडे, ॲड. मोहतेशम रजा, जयप्रसादसिंग राजपूत यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित

# पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते पॉलिटेक्निक महाविद्यालयात डिप्लोमा प्रवेश मार्गदर्शन व फॅसिलिटी सेंटर सुरू

### विद्यार्थी-पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २६ मे

**मलकापूरः** येथील तंत्रशिक्षण क्षेत्रात अग्रगण्य आणि नामांकित असलेल्या पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते पॉलिटेक्निक महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रथम वर्ष पोस्ट एसएससी दहावी नंतरचे पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेअंतर्गत विशेष मार्गदर्शन व मोफत फॅसिलिटी सेंटरची सुरुवात करण्यात आली असून, या अभिनव उपक्रमास पहिल्या दिवसापासूनच विद्यार्थी व पालकांचा प्रचंड प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांनी दिली आहे. तंत्रशिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे अधिकृत प्रवेश वेळापत्रकाची घोषणा करण्यात आली असून यानुसार महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केंद्र पूर्णक्षमतेने सज्ज झाले आहे.

या अधिकृत वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे आणि अर्ज निश्चितीची प्रक्रिया २० मे २०२६ पासून सुरू झाली असून, ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत २२ जून २०२६ पर्यंत असणार आहे; तसेच प्रवेशासाठीची तात्पुरती गुणवत्ता यादी २४ जून २०२६ रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल, तर या यादीत काही तक्रार किंवा दुरुस्ती असल्यास ती सादर करण्यासाठी २५ जून ते ३० जून २०२६ हा कालावधी देण्यात आला असून सर्व हरकतींचा विचार करून अंतिम गुणवत्ता यादी ०२ जुलै २०२६ रोजी जाहीर केली जाणार आहे. या मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाची दारे सुलभ व्हावीत म्हणून मोलाचे मार्गदर्शन केले जात आहे. पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते पॉलिटेक्निक महाविद्यालयातील फॅसिलिटी सेंटरवर मोफत ऑनलाईन नोंदणी, कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे आणि अर्ज निश्चितीची संपूर्ण प्रक्रिया विनाशुल्क करून दिली जात आहे. या सेंटरमध्ये येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार व गुणवत्तेनुसार योग्य अशा अभियांत्रिकी शाखांची निवड करण्याचे करिअर मार्गदर्शन, प्रवेशासाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांची अधिकृत पडताळणी, केंद्रीय प्रवेश प्रक्रियेबाबत मनामध्ये असणाऱ्या विविध शंकांचे निरसन, तसेच भविष्यातील उच्च शिक्षण व रोजगाराच्या संधी संदर्भात महाविद्यालयातील तज्ज्ञ प्राध्यापकांचे मोफत व सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. २६ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यात १ लाख १५ हजार बालकांचे उद्दिष्ट

प्रतिनिधी २६ मे

**♦ राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम २८ जूनपासून, जिल्हाधिकारी यांनी घेतला आढावा**



**अकोला :** राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम, नियमित लसीकरण तसेच जन्म-मृत्यू नोंदणी या विषयांच्या अनुषंगाने माननीय जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेखाली आढावा सभा संपन्न झाली. दि. २८ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचा आढावा घेताना जिल्हाधिकारी यांनी मोहिमेचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत पाच वर्षांखालील बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्यात येणार आहे. याकरिता महानगरपालिका क्षेत्र वगळता ग्रामीण भागासाठी ८७ हजार १७४ तर शहरी भागासाठी २८ हजार २४४ असे एकूण १ लाख १५ हजार ४३८ बालकांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. मोहीम यशस्वी राबविण्यासाठी जिल्ह्यात तीन सदस्यीय ५८१ बूथ तसेच दोन सदस्यीय ६०२ बूथचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच ७२ ट्रान्झिट व ६३ मोबाईल टीम कार्यरत राहणार आहेत. बूथवर न येणाऱ्या लाभार्थ्यांना घरोघरी भेट देऊन पोलिओ डोस देण्यासाठी १ हजार ६९४ घरभेट पथके तयार करण्यात आली आहेत. सभेमध्ये नियमित लसीकरण कार्यक्रमाचाही आढावा घेण्यात आला. नियमित लसिकरणामध्ये नियोजित लसीकरण सत्रे रद्द होणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर लसींची शीतसाखळी (ण्दत् र्ण्पिह) व्यवस्थित राखण्यात यावी तसेच एकही मूल लसीकरणापासून वंचित राहणार नाही यासाठी विशेष काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले. जन्म-मृत्यू नोंदणी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी म्हणाल्या की, जिल्ह्यातील जन्म, मृत्यू तसेच अर्भक मृत्यू घटनांची १०० टक्के नोंदणी होणे आवश्यक आहे. जन्म-मृत्यू नोंदणी ही शासनाच्या [CRS Portal](https://dc.crsorgi.gov.in ?utm_source=chatgpt.com) या संकेतस्थळावरूनच करण्यात यावी. ज्या तालुक्यांमध्ये उशिरा जन्म-मृत्यू नोंदणीचे प्रमाण अधिक आहे, त्या ठिकाणी वेळेत नोंदणी होण्यासाठी जनजागृती व पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच तालुका व गावपातळीवर जन्म-मृत्यू समन्वय समितीच्या सभा नियमित घेणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. सुरक्षेच्या दृष्टीने र्ग्ए ईर्दूत चा ळें घ्ऊ व Password हे केवळ जबाबदार व्यक्तीकडेच ठेवण्यात यावेत, ते कोणालाही शेअर करू नयेत तसेच त्याचा गैरवापर होऊन खोटी प्रमाणपत्रे वितरित होणार नाहीत याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. सभेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत पवार, माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजेकर, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, सर्व गटविकास अधिकारी, सांख्यिकी अधिकारी अंकिता गावंडे तसेच जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी बाळासाहेब घुगे उपस्थित होते.

# सरकारच्या नवीन कायद्यामुळे वैतागले तहसीलदार

**जनतेची कामे करावी की मृतदेहांचे पंचनामे!**

प्रतिनिधी २६ मे

**कार्यालयीन कामावर होत आहे परिणाम**



**अकोला :** सध्या खरीप हंगामाची लगबग सुरू आहे, त्यातच दहावी-बारावीच्या परीक्षा झाल्याने विविध प्रमाणपत्रांसाठी विद्यार्थ्यांची तहसील कार्यालयात गर्दी पहावयास मिळत आहे. अशातच वेळेवर तहसीलदार न मिळाल्याने शेतकरी व विद्यार्थी यांची डोकेदुखी वाढली आहे. त्यांची कामे सुद्धा लांबणीवर पडत आहेत. तहसीलदार वेळेवर मिळत नसल्याचे कारण असे की, भारतीय दंड संहितेच्या (घ्झ्ण) जागी भारतीय न्याय संहिता (ँन्ए) लागू झाली आहे. सरकारने अलीकडेच एक आदेश जारी करून, 'पोलीस कोठडीतील मृत्यू'च्या प्रकरणांमध्ये पंचनामा तयार करण्याचा अधिकार नायब तहसीलदारांकडून काढून तो तहसीलदारांना दिला आहे. शहरातील पोलीस कोठडी, तुरुंग, सुधारगृहे, अनाथाश्रम आणि मनोरुग्णालयांमध्ये होणाऱ्या मृत्यूंच्या बाबतीत, पंचनामा तयार करण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी म्हणून तहसीलदारांची उपस्थिती अनिवार्य आहे. ही प्रक्रिया व्हिडिओद्वारे चित्रित केली जात असल्यामुळे, तहसीलदार पंचनामा तयार करण्यासाठी आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्याला पाठवू शकत नाहीत, कारण त्यांना स्वतः उपस्थित राहावे लागते.

अकोला शहराची लोकसंख्या अंदाजे ७ लाख आहे. येथे ८ पोलीस स्टेशन, तुरुंग, सुधारगृहे, अनाथाश्रम आणि मनोरुग्णालये आहेत. या ठिकाणी होणारे मृत्यू 'अटक अवस्थेतील मृत्यू' मानले जातात. नवीन आदेशानुसार, तहसीलदार आपला बहुतेक वेळ शवागारात घालवत आहेत. मृतदेहांजवळ तीन तासांपर्यंत उभे राहिल्याने शासकीय कामात व्यत्यय येत आहे. त्यामुळे तहसीलदार वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत

**तहसीलदार संघटना करणार शासनाला विनंती**

या नवीन पद्धतीतून आपली सुटका करण्याची विनंती तहसीलदार संघटना जिल्हा प्रशासनाकडे करणार आहे. ७ लाख लोकसंख्येच्या शहरात अशा घटना दररोज घडतात. 'जर एकच तहसीलदार या कामात गुंतलेला असेल, तर शासकीय काम कधी पूर्ण होणार?' हा मोठा प्रश्न निर्माण होत आहे तसेच मृतदेहांजवळ बसल्याने एक विचित्र परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे तहसीलदार संघटना जिल्हा प्रशासनाला विनंती करणार असल्याची माहिती विश्वासनिय सूत्रांनी दिली आहे

# पित्याने चार मुला-मुलींना विहिरीत ढकलून स्वत : ही केली आत्महत्या

प्रतिनिधी २६ मे

**♦ राजुरा शिवारातील दुसरी घटना**

**जळगाव जामोद :** तालुक्यातील राजुरा शिवारात एका पित्याने आपल्या चार मुला-मुलींना विहिरीत फेकून स्वतःही उडी घेत आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना २५ मे रोजी उघडकीस आली आहे. या घटनेत पित्यांसह दोन मुले आणि दोन मुली अशा पाच जणांचा मृत्यू झाला असून, परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजय मुसा किराडीया (२७, रा. राजुरा ग्रामपंचायत उमापूर) यांनी घरगुती वादातून टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे. त्यांनी आपल्या प्रित (७), प्राची (५), पूर्वी (३) व पियुष (दीड वर्षे) या चौघांना विहिरीत टाकून स्वतःही विहिरीत उडी घेतली. ही घटना २४ तारखेच्या मध्यरात्री घडल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, २५ मे रोजी सकाळच्या सुमारास विहिरीत तीन मृतदेह तरंगताना काही ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच जळगाव जामोद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला. पाचही मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. पती-पत्नीतील वादातून ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, या प्रकरणी मुसा रालजी किराडीया यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी मृतक विजय मुसा किराडीया यांच्या विरोधात कलम १०३ (१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अधिक मासानिमित्त श्री श्याम धाम मंदिरात 'आम्र श्रृंगार' सोहळ्याची तयारी

प्रतिनिधी २६ मे



**मुर्तिजापूर :** अधिक मासाच्या पवित्र पर्वात शहरातील श्री श्याम धाम मंदिर भक्तीमय वातावरणाने उजळून निघाले असून कमला एकादशीच्या निमित्ताने बाबा श्याम यांचा विशेष 'आम श्रृंगार' सोहळा मोठ्या भक्तिभावात आयोजित करण्यात आला आहे. या अनोख्या श्रृंगारामुळे श्याम भक्तांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. अधिक मास हा भगवान भक्तीसाठी अत्यंत पुण्यदायी मानला जातो. या पवित्र काळात केलेली पूजा, नामस्मरण आणि सेवा अनेक पटींनी फलदायी ठरते, अशी श्रद्धा आहे. याच पार्श्वभूमीवर श्री श्याम धाम मंदिरात बाबा श्याम यांना रसाळ व सुगंधी आंब्यांनी आकर्षक श्रृंगार करण्यात येणार आहे. मंदिरात भक्ती, सुगंध आणि श्रद्धेचा अद्भुत संगम अनुभवायला मिळणार आहे. विशेष म्हणजे, श्रृंगारासाठी वापरण्यात आलेले आंबे एकादशीच्या रात्री भजन-कीर्तनानंतर सर्व श्याम भक्तांना प्रसाद स्वरूपात वितरित करण्यात येणार आहेत. त्यामुळे भक्तांसाठी हा सोहळा केवळ दर्शनापुरता मर्यादित न राहता, प्रसादाच्या माध्यमातून भक्तीचा आनंद अनुभवण्याची सुवर्णसंधी ठरणार आहे. मंदिर प्रशासनाच्या वतीने सर्व श्याम भक्तांना हाराऐवजी गुलाबाची फुले व इत्र अर्पण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बाबा श्यामांच्या चरणी सुगंधित श्रद्धा अर्पण करत भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. एकादशीच्या रात्री मंदिर परिसरात भजन-कीर्तनाचा भक्तिमय कार्यक्रम रंगणार असून श्याम नामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघणार आहे. अधिक मास आणि कमला एकादशीचा दुर्मिळ योग असल्याने भाविकांमध्ये विशेष उत्सुकता दिसून येत आहे. या भक्तिमय उपक्रमाची संकल्पना सुनिल भोजगढिया यांनी केली असून विशेष आम श्रृंगाराची जबाबदारी भजन गायक योगेश कुमार यांनी स्वीकारली आहे. '॥ हारे का सहारा - बाबा श्याम हमारा ॥' या जयघोषात मुर्तिजापूरातील श्याम भक्त पुन्हा एकदा भक्ती, प्रेम आणि सेवाभावाचा सुंदर संदेश देताना दिसत आहेत.

# उन्हामुळे रसाळ फळांना वाढती मागणी

प्रतिनिधी २६ मे




**ग्राहकांचा दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद**

**अकोला :** शहरातील फळ बाजारात ठोक विक्रेत्यांशी आर आर सी प्रतिनिधीने चर्चा केली असता, तापत्या उन्हामुळे रसाळ फळांना मोठी मागणी आहे. यामध्ये लिची, विविध प्रकारचे आंबे व अननस या फळांना मोठी असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. गेल्या अनेक दिवसापासून अकोला शहरामध्ये सर्वाधिक तापमान नोंदवल्या गेले आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवाची लाहीलाही होत असताना यापासून बचाव म्हणून, यंदा आंब्याचा चांगला उठाव आहे. तसेच ज्यूस करण्यासाठी अननस व लिची या फळांनाही नागरिकांची वाढती मागणी राहिली आहे. उन्हाळ्यात रसाळ फळे मोठ्या प्रमाणात बाजारात येतात तसेच विकली जातात. फळांना मोठी मागणी दिसत आहे.

# बेलखेड शेतशिवारात आता अस्वलाची दहशत

प्रतिनिधी २६ मे




**हिवरखेड :** नजीकच्या बेलखेड शेतशिवारात अचानक अस्वल दाखल झाल्याने शेतकऱ्यांची आणखी चिंता वाढली आहे. आतापर्यंत बिबट्या, वाघाची सर्वत्र चर्चा होती. आता अस्वल सुद्धा या परिसरात दाखल झाले.

एका शेतात अस्वल वानरांचा पाठलाग करताना दिसले. वन विभागाने याची दखल घ्यावी अशी मागणी केली जात आहे. शेतकऱ्याने शेतात पीक पेरणी करावी कशी असा मोठा प्रश्नन निर्माण झाला? उन्हाचे तापमान जास्त वाढले कदाचित पाणी पिण्यासाठी अस्वल शेतात आले असणार असा अंदाज दर्शविला जात असून वनविभागाने तातडीने आपली यंत्रणा या प्राण्यांना सुरक्षित सातपुड्यात सोडवावे जेणेकरून शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी नाही होणार, अशी मागणी या परिसरातील शेतकरी करीत आहेत.

# महापालिकेची स्थायी समिती सभा संपन्न

प्रतिनिधी २६ मे

**♦ शहरातील एलईडी पथदिव्यांची देखभाल व दुरुस्तीचा करार केला रद्द**



**अकोला :** महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत आज शहराच्या दोन झोनमधील मान्सूनपूर्व नालेसफाई तसेच शहराच्या विविध प्रभागांतील विकासकामांना मंजुरी देण्यात आली. तर दुसरीकडे, शहरातील एलईडी पथदिव्यांची देखभाल व दुरुस्तीसाठी १० वर्षांकरिता राज्य पातळीवर निवडलेल्या कंपन्यांचा करार रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सोमवारी महापालिकेची स्थायी समितीची सभा पार पडली. यामध्ये शहरातील २ झोनमधील मान्सूनपूर्व नालेसफाईच्या कामांना आणि शहराच्या विविध प्रभागांतील विकासकामांना मंजुरी देण्यात आली. मात्र, विषय पत्रिकेवरील विषय क्रमांक २६ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्रातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रातील एलईडी पथदिव्यांची देखभाल, दुरुस्ती व नवीन एलईडी सीएमएसचा पुरवठा, स्थापना आणि देखभालीसाठी १० वर्षांकरिता राज्य पातळीवर निवडलेल्या 'बीएसी इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड' व 'विन्सी ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेड' या संस्थांसोबत करार करण्याच्या विषयावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार घमासान पाहायला मिळाले. या विषयाला सत्ताधारी पक्षाच्याही काही सदस्यांनी विरोध दर्शवला. महापालिकेची आर्थिक स्थिती आधीच कमकुवत आहे, अशा परिस्थितीत जे काम २० कोटी रुपयांत होऊ शकते, त्यासाठी ४७ कोटी रुपये खर्च करण्यात काय फायदा? असा सवाल विरोधकांसह सत्ताधारी पक्षाच्याही काही सदस्यांनी उपस्थित केला. त्यानंतर स्थायी समिती सभापतींनी हा करार रद्द करण्याचा निर्णय घेतला. अशी माहिती स्थायी समिती सदस्य हरीशभाई अलीमचंदानी यांनी दिली. तर दुसरीकडे, राज्य सरकारचा हा निर्णय महापालिकांवर लादण्यासारखा आहे, म्हणूनच आम्ही हा विषय रद्द करण्यासाठी आवाज उठवला, अशी प्रतिक्रिया स्थायी समितीचे विरोधी पक्ष सदस्य निलेश देव यांनी दिली.

# दापुरी खुर्द येथे स्पीड ब्रेकर व वाहतूक नियंत्रणाची ग्रामस्थांची मागणी

प्रतिनिधी २६ मे

**रिसोड :** तालुक्यातील दापुरी खुर्द हे गाव रिसोड–मालेगाव–अकोला या महत्त्वपूर्ण राज्य मार्गावर बसलेले असून परिसरातील वाघी, गोवर्धना, येवता, पार्डी तिखे तसेच अनेक गावांचा संपर्क या मार्गाद्वारे जोडलेला आहे. या मार्गावर दिवसेंदिवस वाहनांची वाढती वर्दळ होत असल्याने दापुरी खुर्द परिसर अपघातप्रवण क्षेत्र बनत चालल्याची गंभीर बाब समोर आली आहे. वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दापुरी खुर्द येथील बसस्टॉप परिसरात महत्त्वाचा चौक असल्यामुळे वाहनांच्या वेगाचा आणि दिशेचा अचूक अंदाज नागरिकांना येत नाही. विशेषतः रिसोड–मालेगाव मार्गावरून भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना रस्ता ओलांडताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अनेकदा जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित प्रशासनाने दापुरी खुर्द येथील बसस्टॉप परिसर, धोकादायक वळणे तसेच वर्दळीच्या ठिकाणी तातडीने स्पीड ब्रेकर बसविणे, वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक सूचना फलक उभारणे, झेब्रा क्रॉसिंगची सुविधा उपलब्ध करून देणे तसेच रात्रीच्या वेळी सक्षम प्रकाशव्यवस्था करणे आवश्यक असल्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. याशिवाय अतिवेगाने वाहन चालविणाऱ्या चालकांवर वाहतूक विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात यावी, नियमित वाहतूक तपासणी मोहीम राबविण्यात यावी तसेच शाळा, बसस्टॉप व सार्वजनिक ठिकाणांच्या परिसरात वेगमर्यादा निश्चित करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे.

# गांधी चौक तसेच चौपाटी परिसरातील हटले अतिक्रमण

प्रतिनिधी २६ मे

**♦ लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेले फेरीवाला मार्केट पडले ओस**



**अकोला :** शहरातील मुख्य वर्दळीच्या रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्याची कारवाई महापालिकेच्या अतिक्रमण विभागातर्फे मागील काही दिवसांपासून सुरू आहे. सोमवारी सायंकाळी शहरातील गांधी चौक परिसर, महापालिकेची आवार भिंत तसेच चौपाटी परिसरातील अतिक्रमण हटविण्याची कारवाई उशिरा रात्रीपर्यंत करण्यात आली. चौपाटी परिसरात व्यवसाय करणारे खाद्यपदार्थ विक्रेते कापड विक्रेते चप्पल विक्रेता आदींनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करून ठेवल्याने या रस्त्याने पायी चालणे सुद्धा अवघड झाले होते त्यातच या परिसरात अनेक दवाखाने असल्याने दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांना सुद्धा मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. गांधी चौक तसेच महापालिकेच्या आवार भिंतीस जवळ व्यवसाय करणारे कापड विक्रेते आपल्या गाड्या रस्त्यावरच उभ्या करत असल्याने त्या रस्त्यावर नेहमीच वाहतुकीची समस्या निर्माण होत आहे. दररोज सायंकाळी ट्रॅफिक जाम मुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अशातच काल सायंकाळी या सर्व अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण हटविण्यात आल्याने या मुख्य रस्त्याने अनेक दिवसानंतर मोकळा श्वास घेतल्याचे दिसून आले. अतिक्रमण हटविण्याची ही कारवाई नियमित करावी अशी मागणी नागरिक करीत आहेत कारण एकदा अतिक्रमण हटविण्याची कारवाई केल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी परत अतिक्रमण जैसे ते होऊन जाते त्यामुळे अतिक्रमण हटविण्याची ही कारवाई निव्वळ फार्स ठरू नये अशी नागरिक अपेक्षा व्यक्त करीत आहेत.

**फेरीवाला मार्केट पडले ओस**

◆ शहरातील फेरीवाल्यांना तसेच रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना बसण्यासाठी महापालिकेने लाखो रुपये खर्च करून फेरीवाला मार्केटची निर्मिती केली आहे परंतु या मार्केटमध्ये एकही फेरीवाला बसण्यास तयार नसल्याने हे फेरीवाला मार्केट ओस पडले आहे.
फेरीवाला मार्केटमध्ये रस्त्यावर व्यवसाय करणारे बसण्यास तयार नसल्याने शहरात नागरिकांना रोजच ट्रॅफिक जामचा सामना करावा लागत आहे हे पाहता या मुजोर फेरीवाल्यांना फेरीवाला मार्केटमध्ये बसण्याची शक्ती महापालिका प्रशासनाने करावी अशी मागणी नागरिक करीत आहेत

# शहराच्या काही भागातील पाणी पुरवठा विस्कळीत

प्रतिनिधी २६ मे



**अकोला :** महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाची ६०० मिमी व्यासाची पाईपलाईनवरील एअर वॉल्व कान्हेरीचे पुढे चांगेफळ फाट्याजवळ २४ मेच्या रात्री चार चाकी वाहनाच अपघातामुळे पूर्णपणे नादुरुस्त झाल्याने २५ एम एल डी जलशुद्धीकरण केंद्रावरून शिवनगर, आश्रय नगर, बस स्टॅन्ड, शिवनी, शिवर व शिवापूर या भागाला होणारा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे. दुरुस्ती करण्यासाठी लागणारा कालावधी पाहता ६०० मिमी व्यासाचे पाईपलाईन वरून होणारा शिवनगर, आश्रय नगर, बस स्टॅन्ड, शिवनी, शिवर व शिवापूर या जलकुंभा वरून होणारा पाणीपुरवठा दोन दिवस उशिराने करण्यात येईल याची परिसरातील नागरिकांनी नोंद घ्यावी व पाण्याचा अपवय टाळून अकोला महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग महानगरपालिका अकोला यांनी केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK